# शेतकरी संघटक
स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्याचे पाक्षिक

वर्ष २९ । अंक १ । ६ एप्रिल २०१२

**मूल्य : ₹ १०**

संपादक
**सुरेशचंद्र म्हात्रे**

कार्यकारी संपादक
**श्रीकांत उमरीकर**

सल्लागार संपादक
**डॉ. मानवेंद्र काचोळे**
**डॉ. गिरधर पाटील**

साहाय्यक संपादक
**ज्ञानेश्वर शेलार**

मुखपृष्ठावरील छायाचित्र
**श्रीकृष्ण उमरीकर**

अंक मांडणी
**श्रीकांत दत्तात्रय झाडे**

**वार्षिक वर्गणी : ₹ २०० केवळ**

**(टीप : वर्गणीदारांनी अंकासंबंधी तक्रार असल्यास खालील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.)**
**संपर्क :** कार्यकारी संपादक, पाक्षिक शेतकरी संघटक, जनशक्ती वाचक चळवळ, २४४–समर्थनगर, औरंगाबाद–४३१००१–३१, फोन : ०२४०–२३४१००४. ईमेल : shetkarisanghatak@gmail.com

● हा अंक मालक परदेशी मोहन बिहारीलाल यांच्यासाठी संपादक, मुद्रक, प्रकाशक म्हात्रे सुरेशचंद्र पी., मु.पो. आंबेठाण, ता. खेड, जि. पुणे ४१०५०१ यांनी उदय एंटरप्राईजेस, ७० सी, सर्व्हिस इंडस्ट्रीज टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद ४३१००३ येथे छापून जनशक्ती वाचक चळवळ, 'पिनाक', समर्थनगर, औरंगाबाद–४३१००१–३१ येथे प्रकाशित केला. ● अंकाची प्रसिद्धी दर महिन्याच्या ६ व २१ तारखेला. ● अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

*दि. ६ एप्रिल १९८१ रोजी निपाणी तंबाखू आंदोलनात शासनाने केलेल्या गोळीबारात शहीद हुतात्म्यांना*

## *विनम्र अभिवादन!*



**जानू सूर्यवंशी** (६५) रामपूर
**आबासाहेब आण्णासाहेब इंगळे** (२४) चिखलव्हाळ
**भाऊ लक्ष्मण कोंडीकर** (४०) गळतगा
**गोविंदा लक्ष्मण कोंडीकर** (४५) गळतगा
**ज्योती येऊ गावंड** (२१) भोज
**महादेव भीमराव गावंड** (२१) अकोळ
**ज्ञानदेव मल्लू पाटील** (२०) नांगनूर
**कृष्णा दादू पाटील** (६०) शिरपेवाडी
**दिनकर दाजी चव्हाण** (४५) ममदापूर
**शंकर रामा रेंदाळे** (५०) एकसंबा
**थळू भिवा कांबळे** (५०) जत्रट
**अनंत रामा कुऱ्हाळे** लिंगनूर कापशी कोल्हापूर

पाक्षिक शेतकरी संघटकची सुरुवात या हुतात्म्यांच्या स्मृतीला अभिवादन करून करण्यात आली.

# अंतरंग

■ जागरण
**शेतीविरोधी धोरण – दुष्काळाचे संकट!**
मा. शरद जोशी यांची मुलाखत (सौ. दै. लोकसत्ता) .............. ३

■ विचार
**शरद जोशी – अतुलनीय स्वतंत्रतावादी**
एस. व्ही. राजू.............................................................. ८

■ आजकाल
**आकडेवारीचा खेळ मांडियेला**
ज्ञानेश्वर शेलार.......................................................... १०

■ मुद्दा
**शेतीचा अनर्थ संकल्प**
**आयडिया अनएक्स्चेंड्**
गिरधर पाटील.......................................................... १२

■ कॉमन नॉन सेन्स
**शेतीक्षेत्राची मृत्यूघंटा**
सुधाकर जाधव ......................................................... १५

शेतकरी संघटकच्या २९ व्या वर्धापन दिनानिमित्त होणाऱ्या कार्यक्रमाचा वृत्तांत पुढील अंकात...

# वाटचाल २९ वर्षांची

शेतकरी संघटक या पाक्षिकाला २९ वर्षे पूर्ण झाली. हा कालावधी एक दीर्घ आणि विशेषतः भारतीय पातळीवर एक संक्रमणाचा कालावधी होता. जुनी व्यवस्था ज्याला शेतकरी संघटनेच्या परिभाषेचे आम्ही 'लायसन्स-कोटा-परमीट राज' म्हणतो ती मोडकळीस येत गेली. सरकारची इच्छा नसतानाही बऱ्याच क्षेत्रांमध्ये खुलेपणा १९९१ नंतर स्वीकारावा लागला. त्याही गोष्टीला २१ वर्षे उलटून गेली आहेत.

'शेतकरी संघटक'चा विचार केल्यास बंदिस्त व्यवस्थेपेक्षा खुल्या व्यवस्थेच्या काळातील आयुष्य मोठे आहे. शरद जोशी यांनी जास्तीत जास्त किंबहुना, जवळपास सर्वच लिखाण संघटकमधून केले. शेती, शेतकरी आणि शेतकरी आंदोलन याची फार मोठ्या प्रमाणात चर्चा झाली. दखल घेतल्या गेली; पण या उलट १९९१ पासून ज्या खुलीकरणावर आम्ही सातत्याने विचार मांडत आलो त्याबाबतीत श्रेय शेतकरी संघटनेला, शरद जोशींना आणि पर्यायानेच शेतकरी संघटकलासुद्धा दिल्या गेलं नाही याची खंतही नोंदवून ठेवावी वाटते. खुले धोरण राबविण्यासाठी जो एक दबाव या सरकारवरती निर्माण करण्याची गरज होती तिचा फार मोठा वाटा शेतकरी संघटनेने उचलला. या प्रवासात एक महत्त्वाचं वैचारिक हत्यार म्हणून 'शेतकरी संघटक'चा उपयोग शेतकरी संघटनेला आणि शरद जोशींना झाला. याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो. मोठ्या कठीण परिस्थितीत प्रसंगी चार पानांचे छोटे अंक काढून का होईना संघटकला जिवंत ठेवल्या गेलं.

दोन वर्षांपूर्वी काळाची पावले ओळखून नव्या आकर्षक स्वरुपात 'शेतकरी संघटक' प्रकाशित व्हायला लागला. साध्या झोपडीत राहणाऱ्या माणसाला अचानक पंचपक्वान्नाचं ताट अंगभर चांगले नवे कपडे घालायला भेटावेत, तशीच काहीशी स्थिती खेड्यापाड्यात पसरलेल्या आमच्या वाचकांची झाली. विचाराच्या धनाने हा आमचा वाचक नेहमीच श्रीमंत राहिलेला आहे; पण हेच विचारधन त्याच्यापर्यंत आकर्षक स्वरुपात पाठवता आलं. याचेही थोडेसे समाधान आम्हाला वाटते. नवीन स्वरुपात संघटक सिद्ध करत असताना स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक असे बोधवाक्य आम्ही जाणीवपूर्वकच घेतले. शेतकरी संघटना आणि तिचा विचार हा फक्त शेतकऱ्यांपुरताच नसून सर्व स्वतंत्रतावादी व्यक्तींसाठी आहे हे आम्हाला आवर्जून नोंदवावेसे वाटते. साहजिकच शेतकऱ्यांइतकेच इतर सर्व नागरिकही संघटकचे वाचक म्हणून आम्हाला अभिप्रेत आहेत.




सध्याचा काळ हा एका मोठ्या बदलाचा काळ आहे. खुली व्यवस्था जगभराची एक अपरिहार्य अशी गरज बनली आहे. अमेरिकेतील मंदी आणि युरोपाच्या आर्थिक संकटाने एक वेगळाच संदेश जगभर पसरला आहे. रशियाच्या पतनानंतर सगळ्यांना असं वाटत होतं, की अमेरिकेची भांडवलशाही हीच खरी; पण तिचेही पितळ लवकरच उघडे पडले. स्वतंत्रतावादाची मांडणी करत असताना शरद जोशी यांनी शेतकरी संघटकमध्ये स्वतंत्रतेची मूल्ये या नावाने चार लेख लिहिले होते. त्यांमध्ये अर्क स्वरूपात स्वतंत्रतावादाची मांडणी करण्यात आली होती. हे सर्व विचार आज काळाच्या पातळीवर खरे ठरताना दिसत आहे. जीव छोटासा असतानाही शेतकरी संघटकने आपल्या विचाराची शुद्धता तर सोडली नाहीच, शिवाय मोठ्या धैर्याने विरोध होत असतानाही वैचारिक पातळीवरती लढणाऱ्यांची बाजू लावून धरली.

भविष्यात शेतकरी संघटक हे भव्य आणि व्यापक असे वैचारिक व्यासपीठ व्हावे, असे आम्हाला मनापासून वाटते. समाजवादी व्यवस्था केव्हाच कोसळली. समाजातील विचार करणाऱ्या सर्व वर्गाला आम्ही आव्हान करतो, की त्यांनी त्यांचे स्वतंत्रतावादी विचार आमच्या व्यासपीठावरती मांडावेत. आम्ही त्या विचारांना योग्य तो न्याय देण्याचा जरूर प्रयत्न करू. वैचारिक आदानप्रदान ही गोष्ट आम्हाला जास्त महत्त्वाची वाटते. मायाजालाने (इंटरनेट) सगळं जग जोडलं गेलं असताना वैचारिक देवाणघेवाण मात्र तुलनेने कमी होते. हे चित्र नक्कीच आशादायक नाही. हे बदलण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. त्यासाठी आम्ही आमचा खारीचा वाटा उचलण्याचा प्रयत्न करतो आहोत. सुधाकर जाधव असोत, गिरधर पाटील असोत की अमर हबीब असोत हे आपले लिखाण त्यांच्या ब्लॉगवरती करत असतात आणि शक्य होईल त्यांच्यापर्यंत पोहोचवतात. हेच लिखाण जेव्हा आम्ही संघटकच्या माध्यमातून वाचकांपर्यंत पोहोचवतो तेव्हा त्याची परिणामकारकता जास्त झालेली आढळते. मानवेंद्र काचोळे, अजित नरदे, श्याम अष्टेकर, शेषराव मोहिते, ॲड. सुभाष खंडागळे यांनी अजून सातत्याने लिखाण पाठवावे असे आम्हाला वाटते. गंगाधर मुटे, श्रीकृष्ण उमरीकर व ज्ञानेश्वर शेलार चालू विषयांवरती मेहनत घेऊन लिखाण आम्हाला देतात. ते आमच्या परिवारातलेच असल्यामुळे त्यांच्यावर आमचा हक्कही आहे. महाराष्ट्रात वैचारिक पातळीवर उत्कृष्ट लिखाण करणाऱ्या विनय हर्डीकरांचं नाव आघाडीवर आहे. त्यांनी संघटकसाठी अजून मोठं योगदान द्यावं ही आमची मनापासून अपेक्षा.

हलकं फुलकं लिखाण देण्याचा प्रयत्न अल्प स्वरुपात का होईना आम्ही केला आहे; पण यात सातत्य ठेवता आलेले नाही. ॲड. अनंत उमरीकर, शे. भ. प. थंडा महाराज देगलूरकर (रवींद्र तांबोळी) यांच्या मिश्किल लिखाणाने संघटकच्या वाचकांना हसायला लावले. गंगाधर मुटे यांनी साहित्यिक पातळीवरती अजून काही पैलू घेऊन लिखाण करावे असे सुचवावेसे वाटते.

कुठल्याही आस्थापनासाठी आर्थिक बाजू ही सगळ्यांत महत्त्वाची असते. आमचे जाहिरातदार महिको, संग्रो, बेजो शीतल यांनी हा भार आनंदाने उचलला. मोठ्या प्रमाणात वर्गणीदारांनी रुपये साठवरून रुपये दोनशे पर्यंतची वाढ विनातक्रार सहन केली. त्यांच्या आधारावरच इथपर्यंतची वाटचाल करता आली. अजूनही आम्हाला काही अडचणींना मोठ्या प्रमाणात तोंड द्यावे लागते. महाराष्ट्रभर संघटकच्या विक्रीचे जाळे उभे करता आलेले नाही, तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून स्वतंत्रतावादाला पोषक असे लिखाण मिळवता आलेले नाही याची खंत वाटते. भविष्यात आपणाकडून असेच सहकार्य मिळावे ही अपेक्षा

# शेतीविरोधी धोरण - दुष्काळाचे संकट!

(संकलन : विनायक करमरकर, पावलस मुगुटमल - साभार : दै. लोकसत्ता, रविवार १एप्रिल २०१२)

शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी यांनी आयडिया एक्स्चेंजच्या कार्यक्रमात बोलताना देशातील शेतीच्या स्थितीपासून ते राज्यकर्त्यांच्या चुकीच्या धोरणांपर्यंत अनेक विषयांवर आपली स्पष्ट मते मांडली. शेतीमध्ये रस न राहिलेल्या सध्याच्या पिढीमुळे आणि शेतीला प्रोत्साहन न देण्याच्या सरकारी धोरणांमुळे देश महादुष्काळाच्या खाईत लोटला जाण्याची भीती त्यांनी व्यक्त केली. अफूच्या शेतीबद्दल आपली मते मांडताना त्यांनी या देशात लँडमाफियाच सत्ताधारी बनल्याने त्यांना दूर करण्यासाठी कदाचित ड्रगमाफियांची मदत घेणे भाग पडेल, असे ते म्हणाले. गेल्या चाळीस वर्षांच्या दीर्घ अनुभवातून त्यांनी व्यक्त केलेले विचार अनेक प्रश्नांवर प्रकाश टाकणारे आहेत.



**मुकुंद संगोराम :** शेतीच्या प्रश्नाच्या संदर्भात राष्ट्रीय पातळीवर खऱ्या अर्थानं जागृती करणारा पहिला विचारवंत म्हणून शरद जोशी हे सगळ्या भारताला माहिती आहेत. शेतकऱ्यांचे प्रश्न मध्यमवर्गीयांच्या हॉलमध्ये आणून पोहोचवणारा असा हा विचारवंत आहे. शेतकऱ्यांचं एक मोठं संघटन त्यांनी उभं केलं, त्याबरोबरच त्यांनी मांडलेलं शेतीचं अर्थकारण आणि त्यांनी मांडलेलं शेतीचं तत्त्वज्ञान हेही त्यांचं फार मोठं योगदान आहे. आयडिया एक्स्चेंज कार्यक्रमात त्यांचे मन:पूर्वक स्वागत.

**शरद जोशी :** आज मला महाराष्ट्रातल्या आणि हिंदुस्थानातल्या शेतीची जी अवस्था दिसते ती थोडक्यात अशी की, शेतकरी संघटनेने जे तत्त्वज्ञान मांडलं त्याच्यात कर्जमुक्ती का व्हावी हे सांगितलं. सारी शेतकी कर्ज ही बेकायदेशीर आहेत, अनैतिक आहेत हा एक महत्त्वाचा मुद्दा मांडला. दुर्दैवाने हे तत्त्वज्ञान न पटलेल्या लोकांनी कर्जमुक्ती आणली आणि त्यामुळे झालं असं की, आमच्या घोषणेमध्ये कर, कर्जा नही देंगे, बिजली का बिल भी नही देंगे हे महत्त्वाचं कलम होतं. त्याच्यातलं बिजलीचं बिल ते लोक विसरू गेले. अशा तऱ्हेने कर्जमुक्ती अंमलात आणल्यामुळे झालंय असं की, सगळ्या शेतकऱ्यांची विजेची बिलं अजूनही थकित राहिलेली आहेत आणि आपले काका काय म्हणतात त्याच्याकडे लक्ष न देता पुतण्या मोठ्या उत्साहानं विजेची कनेक्शन्स कापायला निघाला आहे. शेतकऱ्यांना वीज नाही. पेट्रोल आणि डिझेलचे भाव भडकलेत. शेतीला माणसं मिळत नाहीत. जी काही लहानसहान हत्यारं, साधनं किंवा यंत्र पाहिजेत ती मिळत नाहीत. सगळ्या जमिनीचा आकार कमी करण्याच्या केंद्र शासनाच्या योजना चालू आहेत. हे जर पाहिलं, तर शेतकऱ्यांना आज शेती करणं हे आत्ताच अशक्य झालेलं आहे. आज मला अन्नसुरक्षा ही अशक्य गोष्ट आहे असं वाटतं आणि त्याचं तत्त्वज्ञानही चुकीचं आहे. म्हणजे लोकांना भीक घालून अन्नसुरक्षा होते, ही कल्पनाही मला मान्य नाही. त्यामुळे अन्नसुरक्षा कितपत यशस्वी होईल याच्याबद्दल मला जबरदस्त शंका आहे. आम्ही सरकारी अनुदानाची भीक न मागता प्रत्यक्षात शेतकऱ्यांना खुल्या बाजारात जो काय भाव मिळेल तो मान्य होईल असं सांगितलं. जर का सरकारी हस्तक्षेप नसेल, तर त्या बाजारपेठेमध्ये शेतकऱ्यांना उत्पादनखर्च भरून निघणारी किंमत मिळते. ज्या बाजारपेठेमध्ये सरकारी हस्तक्षेप आहे, त्या बाजारपेठेमध्ये योग्य ती किंमत ठरणं अशक्य आहे, ही मुळामध्ये आमची अडचण आहे.

**गिरीश कुबेर :** अर्थकारणाच्या उदारीकरणाला साली सुरुवात झाली. त्याला आता एकवीस वर्ष पूर्ण होताहेत. हे सगळं बघता हे उदारीकरण आणि एकंदर शेतीचं भलं याची काही सांगड कुठे घातली गेली असं तुम्हाला वाटतं का? तुमचा या उदारीकरणालाच आक्षेप आहे, का शेतीपुरतं उदारीकरण झालं नाही असं म्हणायचंय?

**शरद जोशी :** उदारीकरणाचा गाभा केंद्र शासनाला समजला नाही. त्यामुळे बाजारपेठ स्वतंत्र ठेवायची, त्याच्यामध्ये सरकारी हस्तक्षेप ठेवायचा नाही, ही कल्पना कोणालाही मान्य झाली नाही. आज करुणानिधींनी म्हटलं तर कापसावर निर्यातबंदी लादली जाते. शरद पवार त्याला काही करू शकत नाहीत. उदारीकरण प्रामुख्याने फक्त कारखानदारी आणि अर्थविषयक सेवा यांच्यापुरतंच मर्यादित राहिलं. शेतीपर्यंत ते कधीही आलं नाही. आम्ही आयोजित केलेल्या एका चर्चासत्रात डॉ. मनमोहनसिंग आले होते आणि त्यांनी त्यावेळी सर्वासमोर कबूल केलं की, आमचे इकॉनॉमिक रिफॉर्म्स शेतीपर्यंत आले नाहीत. शेतीवर वेगवेगळी बंधन घालणं हे जे सरकारला करता येतं, ते करणं सरकारला अशक्य व्हावं, अशी जर परिस्थिती झाली,

## हे तर कत्तलखाने

कृषी उत्पन्न बाजार समित्यांमुळे शेतकऱ्यांचं नुकसान झालं. पूर्वी भाव पटला नाही तर शेतकरी माल द्यायचा नाही. तो त्याच्या घरी पडून राहत असे. आता असं झालंय की, तो माल विकायला बाजार समितीत न्यायचा आणि तिथे गेल्यावर जो मिळेल तो भाव. तो भाव घेऊनच माल काढून टाकला पाहिजे. नाहीतर माल परत आणणं त्याला परवडणारं नसतं. त्यामुळे तो तिथे पकडल्यासारखा होतो. उंदीर सापळ्यात सापडल्यानंतर जी अवस्था होते ती शेतकऱ्याची बाजार समितीत माल घेऊन आल्यानंतर होते. या समित्या म्हणजे शेतकऱ्यांचे कत्तलखाने आहेत.

## शेती करावी तरी कशी

शेतकऱ्यांनी पिकवावं काय मला सांगा. जर का त्याच्याकडे काम करायला माणसं नसतील, पाणी नसेल, वीज मिळत नसेल, औषधं, खतं मिळत नसतील, तर त्यानी कशी काय शेती करायची. त्याला शेती करणं अशक्य करून टाकलंय तुम्ही.

## सरकारी नीती

शेतकऱ्याला कर्जात ठेवणं आणि शेती गरीब ठेवणं हे केंद्र शासनाचं जाणीवपूर्वक आणि नियोजनपूर्वक ठरलेलं धोरण आहे, असं मला वाटतं.

तर मग खऱ्या अर्थानं खुली बाजारपेठ निर्माण होईल. या बाजारपेठेत जी किंमत ठरेल ती आम्हाला मान्य होईल आणि त्या किंमतीमध्ये शेतकऱ्यांना न्याय मिळतो.

**कुबेर :** यातून पुन्हा एक नवा संघर्ष तयार होतो. वस्तूंच्या किमती वाढू देत अशी कुठेतरी मांडणी होते. हा संघर्ष कसा सोडवायचा? ग्राहकांचं हित सांभाळायचं, शेतकऱ्यांचं पण हित सांभाळायचं हे प्रत्यक्षात येऊ शकतं का?

**शरद जोशी :** मला वाटतं की, शेतकरीहित आणि ग्राहकाचं हित यांचं संतुलन करणं हे सरकारला कधीही जमलेलं नाही. मार्क्सनं टाऊन ॲन्ड कंट्री यांच्यातला जो वादविवाद आहे तो मांडताना शेतकरी आणि ग्राहकांचं हित यांच्यामधून संघर्ष दाखवला होता. ग्राहक हे पोलिटिकली किती ॲक्टिव्ह आहेत त्याच्यावर निर्णय ठरतो. एकाच वर्षी कांद्याचे भाव वाढल्यामुळे पाच ठिकाणच्या पोटनिवडणुका केंद्र सरकार हरलं. तेव्हापासून त्यांनी थोडा काळ धसका घेतला; पण लगेच पुढच्या वर्षी त्यांनी लगेच ग्राहकांचं हित सांभाळण्यासाठी निर्यातबंदी केली होती. ज्यावेळी कांद्याचा भाव एक रुपया किलो होता, तेव्हा सिनेमाच्या बाल्कनीचं तिकिट अडीच रुपये होतं. आता बाल्कनीचं तिकिट अडीचशे रुपये झालं आहे. या न्यायाने कांद्याचा भाव शंभर रुपये व्हायला हवा. ग्राहक राजकीयदृष्ट्या किती संवेदनशील आहे आणि शेतकरी तितका होऊ शकतो का, हा मुद्दा खरा महत्त्वाचा आहे. शेतकरी राजकीयदृष्ट्या संवेदनशील होऊ शकला नाही, कारण जितक्या प्रमाणामध्ये दलितांमध्ये डॉ. आंबेडकरांना राजकीय ध्रुवीकरण करता आलं, त्या प्रमाणात मी करू शकलो नाही, हे माझं मोठं अपयश आहे. शहरातला ग्राहकवर्ग आणि खेड्यातला शेतकरी वर्ग यांची जाती वेगळी आहे आणि लोहियांनी म्हटल्याप्रमाणे जातीसंकल्पना अत्यंत महत्त्वाची आहे. जातीव्यवस्था लक्षात न घेतल्यामुळे आपल्याला टाऊन ॲन्ड कंट्री हा वाद हिंदुस्थानात कुठेही सोडवता आला नाही. ग्राहक आणि शेतकरी ही रेषा अधिकाधिक खोल होत गेली.

सरकारी हस्तक्षेप जाणीवपूर्वक कुठे करायचा नाही, ही जर एक शिस्त आपण पाळून घेतली, तर बाजारपेठेमध्ये आवश्यक तडजोड होण्यासारखी आहे. शेतीवर कोणतीही बंधनं घालायची नाहीत या मुद्याचा खरा अर्थ असा की, शेतकऱ्यांना जर तुम्ही शेततेल; म्हणजे इथेनॉलला शेततेल असा शब्द मी तयार केलाय. हे शेततेल जर शेतकऱ्यांना करून दिलं, तर खरं म्हणजे हिंदुस्थानची गरज भागण्यासारखी आहे. पेट्रोल, डिझेलचा तुटवडा त्यामुळे मोठ्या प्रमाणात कमी होईल. त्याला उत्तेजन द्यायचं तर सोडून द्या. त्याच्यावर बंदीच घातली जाते. तर अशातऱ्हेनं बंदी हा शब्द काढून टाकला, तरी आमचं मोठं कल्याण होणार आहे.

**विनायक करमरकर :** सरकारी हस्तक्षेप बाजूला ठेवला, तरी शेतकऱ्याला लुटणारी आडत्या, दलाल, वाहतूकदार, किरकोळ व्यापारी ही यंत्रणा आहेच की. त्याचं काय करणार?

**शरद जोशी :** मी हा विचार कधीही मान्य केला नाही. मध्यस्थांची जी काही रांग आहे, ती आपापलं काम बजावते आणि त्या कामाचं महत्त्व आहे. दलाल वा मध्यस्थ हा फायदेशीररीत्या व्यवसाय करत नाही. जोपर्यंत त्याला राजकीय आश्रय मिळत नाही, तोपर्यंत त्याचा धंदा फायद्याचा होऊ शकत नाही. डॉ. लेले यांचा एक सिद्धान्त आहे या विषयावरती. त्यांनी असा पॅटर्न दाखवला आहे की, त्या पॅटर्नमध्ये दर तीन वर्षांनी जे दलाल असतात ते नगरपिते तरी होतात किंवा आमदार तरी होतात. मग त्यांना राजकीय प्रोटेक्शन मिळतं. त्याच्यातून ते पैसे वसूल करू शकतात. अन्यथा, मध्यस्थी हा काही फायदेशीर धंदा नाही.

**कुबेर :** देशात एकंदरीतच चलती मध्यस्थांची आहे. मग ते राजकीय पातळीवर असतात, आर्थिक पातळीवर असतात..

## राष्ट्रवादीचे कारस्थान

गेल्या काही दिवसात अफुच्या शेतीची प्रकरणं बाहेर आली त्याची टिपणी अशी की, ज्या ज्या ठिकाणी राष्ट्रवादीला अपेक्षेपेक्षा कमी मतं मिळाली तिथं तिथं ही प्रकरणं गृहमंत्र्यांनीच काढलेली आहेत. जो काही नार्कोटिक्स ॲक्ट आहे त्याप्रमाणे खसखस पिकवायला बंधन नाही. मध्यप्रदेशाप्रमाणे सरकारनेच त्याला परवानगी द्यावी, अशी भूमिका मी मांडली. त्याच्यातून फायदा असा होईल की आत्महत्या करायची का नक्षलवाद्यांबरोबर जायचं, याला जिवंत राहण्यासाठी शेतकऱ्याला तिसरा पर्याय मिळू शकेल.

## विदर्भातील शेतकरी वाचला असता

आपल्याकडे पश्चिम महाराष्ट्रातल्या उस पिकवणाऱ्यांना निदान गुळाचे रवे तयार करण्याची सवय होती. त्याप्रमाणे विदर्भातल्या शेतकऱ्यांना जर का लहान पातळीवरती सूत काढण्याचं किंवा हातमाग घालण्याचं जर ट्रेनिंग दिलं असतं, तर मला असं वाटतं की, कापूस एकाधिकार हा इतक्या वाईट तऱ्हेनी पडला नसता.



**शरद जोशी :** कृषी उत्पन्न बाजार समित्या ज्या काढल्या गेल्या त्यांनी जर का मध्यस्थांची संस्था फॉर्मलाईज केली नसती, तर आज चित्र खूप वेगळं दिसलं असतं. या समित्यांमुळे शेतकऱ्यांचं नुकसान झालं. पूर्वी भाव पटला नाही तर शेतकरी माल द्यायचा नाही. तो त्याच्या घरी पडून राहत असे. आता असं झालंय की, तो माल विकायला बाजार समितीत न्यायचा आणि तिथे गेल्यावर जो मिळेल तो भाव. तो भाव घेऊनच माल काढून टाकला पाहिजे. नाहीतर माल परत आणणं त्याला परवडणारं नसतं. त्यामुळे तो तिथे पकडल्यासारखा होतो. उंदीर सापळ्यात सापडल्यानंतर जी अवस्था होते ती शेतकऱ्याची बाजार समितीत माल घेऊन आल्यानंतर होते. आम्ही कृषी उत्पन्न बाजार समित्या या शेतकऱ्यांचे कत्तलखाने आहेत हा मुद्दा स्पष्ट केला. अलिकडे आपण पाहिलं की एफडीआय आणि रिटेलबाबत मनमोहनसिंगांनी चुकून एक बरोबर धोरण घेतलं होतं आणि लगेच ते मागे घेतलं.

**कुबेर :** पण एफडीआय आणि रिटेलला अत्यंत उजवे आणि अत्यंत डावे या दोन्ही लोकांचा विरोध आहे..

**शरद जोशी :** काही डाव्यांना फॉरिन या शब्दाचीच मुळी ॲलर्जी आहे. परंतु, फॉरिन डायरेक्ट इन्व्हेस्टमेन्ट आल्यानंतर त्यातून काय काय होणार आहे हा मुद्दा स्पष्टपणे लक्षात घेतला असता सगळ्यात जास्त कल्याण हे शेतकऱ्याचं होणार आहे. आम्ही शिवार नावाचं रिटेल नेटवर्क बांधायला घेतलं आणि ते काही प्रमाणात यशस्वी झालं. आमचं भांडवल कमी पडलं. नाहीतर आज जी सगळी सुपर मार्केटस् दिसताहेत ती शेतकरी संघटनेची असती आणि मग आमच्या बरोबर कोणतंही सरकारसुद्धा स्पर्धा करायला टिकू शकलं नसतं.

**अभिजित बेल्हेकर :** स्वातंत्र्याला साठ वर्ष होऊन गेली, तरी शेतमालाला आपण दर का देऊ शकत नाही? याच्यामागचं नेमकं अर्थशास्त्र काय आहे? आज शेती का करायची हाच प्रश्न आहे.

**शरद जोशी :** कारखानदारीला संरक्षण देणं हाच प्राधान्यक्रम आहे. त्यामुळे दोन महत्त्वाच्या गोष्टी होतात. त्यात कच्चा माल स्वस्त करणे आणि त्याच्याबरोबर वेजगुडस्च्या किंमती कमी ठेवणे असं केलं जातं. हे कमी केलं म्हणजे मग कारखानदारी आपली आपण टिकू शकते. आज शेती का करायची याचं उत्तर तुम्हाला हळूहळू मिळत आहे. अशी परिस्थिती आहे की, शेतीला तेल नाही, वीज नाही, मशिनरी नाही. ही जर परिस्थिती राहिली, तर सगळ्या हिंदुस्थानामध्ये शेवटी जे उत्तर मिळणार आहे ते प्रचंड, महाप्रचंड दुष्काळ तयार होऊन मिळणार आहे, असं मला वाटतं. चाळीस टक्के शेतकऱ्यांना शेतीच करायची नाहीये. शेतीचा फक्त तुकडा घेऊन ठेवणं, त्याच्यामधून उत्पादनच काढायचं नाही हा एक ॲडिशनल फॅक्टर आहे.

**संगोराम :** आपण महादुष्काळाकडे चाललो आहोत का?

**कुबेर :** एका बाजुला शेतमालाचं उत्पादन प्रचंड वाढलेलं आहे आणि दुसऱ्या बाजूनं तुम्ही म्हणताय की आपण महादुष्काळाकडे चाललेलो आहोत.

**शरद जोशी :** पहिली गोष्ट म्हणजे शेतीसंबंधीची जी आकडेवारी आहे त्या आकडेवारीबद्दल मला जबरदस्त संशय आहे. ही सगळी आकडेवारी पुन्हा तपासून घ्यायला पाहिजे आणि ती आकडेवारी नीट करण्याची यंत्रणा आपल्याकडे नाही. त्याच्यामुळे दुष्काळ आहे असं नाही; पण शेतकऱ्यांनी पिकवावं काय मला सांगा. जर का त्याच्याकडे काम करायला माणसं नसतील, पाणी नसेल, वीज मिळत नसेल, औषधं, खतं मिळत नसतील, तर त्यानी कशी काय शेती करायची. त्याला शेती करणं अशक्य करून टाकलंय तुम्ही.

**मिलिंद ढमढेरे :** शेतकरी कर्ज घेतो; पण ज्या कारणासाठी घेतो त्यासाठी त्याचा विनियोग करत नाही, त्याबाबत..

**शरद जोशी :** त्याचं प्रमाण खूप कमी आहे. मी जेव्हा शेतकरी संघटनेची स्थापना केली त्यावेळी सर्व अर्थशास्त्राची पुस्तकं तुमच्या म्हणण्याप्रमाणे म्हणत असत की, शेतकरी हा अज्ञानी आहे, निरक्षर आहे. तो लग्नामुंजीवर जास्त खर्च करतो, तो व्यसनी आहे आणि त्यामुळे तो कर्जात आहे, ही मांडणी होती. शेतकऱ्याला कर्जात ठेवणं आणि शेती गरीब ठेवणं हे केंद्र शासनाचं जाणीवपूर्वक आणि नियोजनपूर्वक ठरलेलं धोरण आहे, असं मला वाटतं.

**संगोराम :** तुम्ही काम सुरू केलंत त्यानंतरच्या / वर्षांनंतरची परिस्थिती यामध्ये तुम्हाला काही गुणात्मक फरक दिसतो का? शेतकऱ्यांच्या आत्महत्या गेल्या पाच वर्षांच्या काळात प्रचंड प्रमाणावर वाढल्या..

**शरद जोशी :** गुणात्मक फरक असा दिसतो की, शेतकरी संघटनेची भाषा सगळे नेते वापरू लागले आहेत. सगळ्यांनी शेतकरी संघटनेचं तत्त्वज्ञान मान्य केलंय; पण ज्यांच्या हाती सत्ता आहे, त्यांनी त्याची अंमलबजावणी करताना मात्र वेडीवाकडी अंमलबजावणी केली. जशी कर्जमुक्तीची केली तशी. कर्जाच्या बाबतीत बघितलं, तर त्यातले बहुसंख्य शेतकरी हे कापूसपट्ट्यातले आहेत. कापसाची परिस्थिती अशी आहे की, जागतिक बाजारपेठेमध्ये जेव्हा  रुपये भाव होता, तेव्हा कॉटन कॉपरेरेशन ऑफ इंडिया  रुपये दर देत होते आणि महाराष्ट्र एकाधिकार कापूस योजनेखाली विदर्भामध्ये  रुपये मिळत होते. म्हणजे  ते  हा फरक पाहिला, तर तुम्हाला कापूस उत्पादक शेतकरी आत्महत्या का करतो हे लक्षात येईल. उसाप्रमाणे कापूसही कॅशक्रॉप आहे. एक महत्त्वाचा मुद्दा मी पहिल्यांदा मांडतोय कदाचित, आपल्याकडे पश्चिम महाराष्ट्रातल्या उस पिकवणाऱ्यांना निदान गुळाचे रवे तयार करण्याची सवय होती. त्याप्रमाणे विदर्भातल्या शेतकऱ्यांना जर का लहान पातळीवरती सूत काढण्याचं किंवा हातमाग घालण्याचं जर ट्रेनिंग दिलं असतं, तर मला असं वाटतं की, कापूस एकाधिकार हा इतक्या वाईट तऱ्हेनी पडला नसता.

**सुशांत कुलकर्णी :** बीडमध्ये पन्नास एकरात अफुची शेती करण्याचा प्रयत्न झाल्याचं दिसून आलं...

**शरद जोशी :** अलीकडे खसखशीच्या शेतीला प्राधान्य देण्याचा एक सिद्धान्त मी मांडला. गेल्या काही दिवसात अफुच्या शेतीची प्रकरणं बाहेर आली त्याची टिपणी अशी की, ज्या ज्या ठिकाणी राष्ट्रवादीला अपेक्षेपेक्षा कमी मतं मिळाली तिथं तिथं ही प्रकरणं गृहमंत्र्यांनीच काढलेली आहेत. जो काही नार्कोटिक्स ॲक्ट आहे त्याप्रमाणे खसखस पिकवायला बंधन नाही. मध्यप्रदेशाप्रमाणे सरकारनेच त्याला परवानगी द्यावी, अशी भूमिका मी मांडली. त्याच्यातून फायदा असा होईल की आत्महत्या करायची का नक्षलवाद्यांबरोबर जायचं, याला जिवंत राहण्यासाठी शेतकऱ्याला तिसरा पर्याय मिळू शकेल. लॅन्डमाफिया विरुद्ध ड्रगमाफिया असा सामना झाला आणि जर मला ड्रगमाफियाच्या बाजूनं जावं लागलं, तर कदाचित लॅन्डमाफियावर मात करता येईल, अशी आशा मी बाळगतो आणि महाराष्ट्रात जर परिस्थिती पाहिली, तर लॅन्डमाफिया इज द रुलिंग माफिया.

**करमकर :** शेतकरी संघटनेकडे तुम्ही आता कोणत्या नजरेने पाहता? आता संघटनेबद्दल काय वाटतं?

**शरद जोशी :** संघटना अगदी उच्च कोटीला होती तेव्हासुद्धा मी म्हटलं होतं की, शेतकरी संघटनेचा विचार हा जास्तीतजास्त वीस वर्ष चालणारा विचार आहे आणि आता वीस वर्ष होऊन गेली आहेत. आत्मविसर्जन असंही म्हटलं होतं; पण काही आत्मविसर्जनं ही डीफॅक्टो होतात. काही डीयूज करावी लागतात.

**करमरकर :** हजारो ग्रामीण महिलांना शेतकरी संघटनेच्या आंदोलनात तुम्ही सहभागी करून घेऊ शकलात, हे कशामुळे साध्य झालं असं वाटतं? हे यश कशामुळे मिळालं?

**शरद जोशी :** मी शेतकरी होण्याकरता अत्यंत प्रामाणिकपणे स्वतः शेतकरी झालो आणि शेतकरी झाल्यामुळे शेतकऱ्याची दुःखं मला खऱ्या अर्थानी समजली. त्यामुळे त्याची औषधोपचाराची योजना मी करू शकलो. तसंच शेतकरी स्त्री होणं मला स्वतःला जरी शक्य नसलं, तरीसुद्धा शेतकऱ्यांच्या घरामध्ये जाऊन, विचारविनिमय करण्याची जी पद्धत आम्ही काढली त्या पद्धतीमुळे स्त्रियांचे काही प्रश्न आम्ही मांडू शकलो.

**कुबेर :** एका विचित्र परिस्थितीत सध्या आपण आहोत का? आहोत, असे मला अशा अर्थाने वाटते की, सर्वसाधारणपणे कुठल्याही खात्याचा मंत्री हा त्या खात्याचा विकास कसा होईल, त्या खात्याची प्रगती कशी होईल याची काळजी घेत असतो. आपल्या देशाचा शेतीमंत्री असं सांगतो की तुम्ही शेती सोडा. हा एक विरोधाभास नाही का?

**शरद जोशी :** शरद पवारांनी शेती सोडा असा सल्ला दिला. किंवा अप्रत्यक्षरीत्या शेतकऱ्यांनी बिगरशेती व्यवसाय चालू करावा, असे सांगितले, त्याचा अर्थ तोच आहे. शेतकऱ्यांकरिता एका एक्झिट पॉलिसीची गरज आहे. जमिनीच्या किमती वाढत आहेत, त्याचा फायदा घेतला पाहिजे. शेतकऱ्यांनी इतकी वर्षे जमिनीचा तोटा सहन केला. आता त्याचा फायदा घेऊन त्यांना सुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतीसाठी एक्झीट पॉलिसीची गरज आहे.

**सुशांत कुलकर्णी :** प्रोटेक्शन ऑफ प्लांट व्हरायटीज अँड फार्मर्स राईट ॲक्ट च्या अंमलबजावणीबाबत प्रश्नचिन्ह आहेत. अशा गोष्टींबाबत शेतकरी संघटनेने काय केले?

**शरद जोशी :** शेतकरी संघटनेने पहिल्यापासून दोन उद्दिष्टे ठेवली. एक बाजारपेठेचे स्वातंत्र्य मिळवून देणे व तंत्रज्ञानाचे स्वातंत्र्य मिळवून देणे. याच्यापलीकडे कोणतीही कन्स्ट्रक्टिव्ह ॲक्टिव्हिटी करण्याचा मानस नव्हता. मुळात आमच्या संघटनेची भूमिका ही आंदोलनात्मक होती. आंदोलनात्मक भूमिका असल्यामुळे काही प्रमाणात कन्स्ट्रक्टिव्ह काम घेता आले नाही. आम्हाला साधे अजून रजिस्ट्रेशन करणे जमले नाही.

**कुबेर :** म्हणजे शेतकरी संघटना रजिस्टर नाही?

**शरद जोशी :** अजूनही रजिस्टर नाही. आंदोलक संघटना आहे म्हटल्यावर आम्ही त्याचा ट्रस्ट करण्याचा प्रयत्न केला. पण ट्रस्ट म्हणूनही त्याला मान्यता मिळाली नाही.

**बेल्हेकर :** एका बाजूला शेती सोडा म्हणायचे आणि दुसऱ्या बाजूला उद्योगाने मोठ्या प्रमाणात शेती विकत घ्यायची. हा भविष्यातला धोका नाही का? आज जे उद्योजक आहेत, हीच मोठमोठी मंडळी उद्या शेतीचे मालक असतील, असा धोका या कॉर्पोरेट फार्मिंगमुळे वाटत नाही का?

**शरद जोशी :** तो धोका कसा दूर करता येईल किंवा त्याच्यावर बंधने कशी घालता येतील, हा मुद्दा किरकोळ आहे. पण केवळ हिंदुस्थानच्या भूमीवरती नाही, आज इथियोपियाच्या जमिनीवरही हा वाद तयार होणार आहे. इथियोपियातल्या जमिनी हिंदुस्थानातील शेतकऱ्यांना उपलब्ध करून देणे, अशी शक्यता तयार होत आहे. हा प्रश्न केवळ हिंदुस्थानपुरता मर्यादित

अलीकडे खसखशीच्या शेतीला प्राधान्य देण्याचा एक सिद्धान्त मी मांडला. गेल्या काही दिवसात अफुच्या शेतीची प्रकरणं बाहेर आली त्याची टिपणी अशी की, ज्या ज्या ठिकाणी राष्ट्रवादीला अपेक्षेपेक्षा कमी मतं मिळाली तिथं तिथं ही प्रकरणं गृहमंत्र्यांनीच काढलेली आहेत. जो काही नार्कोटिक्स अॅक्ट आहे त्याप्रमाणे खसखस पिकवायला बंधन नाही. मध्यप्रदेशाप्रमाणे सरकारनेच त्याला परवानगी द्यावी, अशी भूमिका मी मांडली. त्याच्यातून फायदा असा होईल की आत्महत्या करायची का नक्षलवाद्यांबरोबर जायचं, याला जिवंत राहण्यासाठी शेतकऱ्याला तिसरा पर्याय मिळू शकेल. लॅन्डमाफिया विरुद्ध ड्रगमाफिया असा सामना झाला आणि जर मला ड्रगमाफियाच्या बाजूनं जावं लागलं, तर कदाचित लॅन्डमाफियावर मात करता येईल, अशी आशा मी बाळगतो आणि महाराष्ट्रात जर परिस्थिती पाहिली, तर लॅन्डमाफिया इज द रुलिंग माफिया.

राहिलेला नाही. हा लँडमाफिया महाराष्ट्राच्या बाहेर जाऊन हिंदुस्थानात पसरतोय. इतकेच नाही, दुसऱ्या देशांवरही पंजा टाकतो आहे, एवढाच त्याचा अर्थ आहे.

**कुबेर :** शेतकरी संघटनेचा हा प्रवास सुरू असताना तुमचे राजकीय प्रयोगही झाले. एका वेळी तुम्ही फर्नांडिस यांच्याबरोबर होतात. शिवाजी पार्कची एक रॅली मला आठवते की तिथे ठाकरे, व्ही. पी. सिंग, दत्ता सामंत होते. असे वेगवेगळय़ा रंगांचे, वेगवेगळय़ा राजकीय पक्षांच्या बरोबर तुम्ही होतात. या सगळय़ा राजकीय बेरजा-वजाबाक्यांचा शेतकरी संघटनेच्या परिणामकारकतेवर एकंदरीत काही फरक पडलाय का?

**शरद जोशी :** असं झालं, कारण संघटनेमधली लढाऊ वृत्ती कमी झाली आणि शेतकरी संघटनेतील लोकांची थोडीशी ऐषोरामी झाली. बाकीच्या लोकांच्या वागण्याच्या पद्धतीमुळे निवडणुकांमुळे जिथे जिथे संपर्क आला तिथे त्यांची रोगराई पसरली. थोडा काळही बदलला. आता सोनिया गांधींच्या सभेलासुद्धा रोजगार दिल्याखेरीज आणि जेवण दिल्याखेरीज एक मनुष्य जमत नाही, ही आजची परिस्थिती आहे.

**कुबेर :** शेतकरी संघटनेची पुढची दिशा काय? शेतकरी संघटना हे नाव असू दे किंवा नसू दे, पण शेतकऱ्यांचे प्रश्न व एकंदरीत त्याचं राजकारणाच्या संदर्भातला परीघ त्याची पुढची दिशा कशी असणार आहे.

**शरद जोशी :** मला वाटतं याचा निर्णय, सचिनने जसे म्हटलं की मी रेकॉर्ड केलं ते मोडणारा भारतीयच निघावा, तसं या महाराष्ट्रातला आणखी एक सुपुत्र जन्मावा, अशी एक इच्छा फक्त मी व्यक्त करू शकतो. माझा स्वतःचा कालखंड हा संपत आला आहे, अशी माझी प्रामाणिक भावना आहे. मी जेव्हा आत्मविश्वासाच्या गोष्टी केल्या तेव्हा ते इंडिकेट करीत होतो, पण काही कार्यकर्त्यांच्या आग्रहामुळे मी आपलं चालत राहिलो. पण, ते दिवसेंदिवस सहन होईना आणि मग त्याचा परिणाम माझ्या प्रकृतीवर होऊ लागला. नंतर मग आता प्रत्यक्षात अपंगावस्थेत येऊन पोहोचलो.

**कुबेर :** क्वांटम फिजिक्स हा तुमचा हल्लीचा आवडीचा विषय झाला, त्याचे कारण काय.

**शरद जोशी :** वाचनातून क्वांटम फिजिक्सशी माझा संबंध आहे. पण, प्रत्यक्षामध्ये सध्या मला अध्यात्मात स्वारस्य वाटते, जेनिटेक इंजिनिअरिंग आणि जीन मॉडिफिकेशन या सिद्धांतात पडल्यानंतर. या सगळ्या क्षेत्रात जीवनाचे महत्त्व काय आहे, अशा प्रवाहातनं जात असताना मी अध्यात्माकडे गेलो. शेतीबद्दल एक नवा विचार मांडू शकलो, तितकाच अध्यात्मातही मांडता यावा, अशी माझी प्रार्थना आहे.

**कुबेर :** लॅन्ड अॅक्विझिशनचा नव्या ड्राफ्टबाबत तुमची भूमिका काय?

**शरद जोशी :** नागरिकांचे जे हक्क आहेत, ते शेतकऱ्यांना आहेत की नाही, ते असतील तर शेतकऱ्यांना जोवर शेती करायची आहे तोवर त्याला शेतीतून पळून जाता येऊ नये. त्याला पाहिजे असेल तर शेती करता यावी. तोवर कोणतेही सरकार त्याला हात लावणार नाही. शेती विकायची असेल, तर पाहिजे त्याला ती विकता यावी, हा मूळ आंबेडकरी घटनेने दिलेला अधिकार त्याचा शाबूत राहिला पाहिजे.

**कुबेर :** तुमचा या लॅन्ड अॅक्विझिशन अॅक्टला विरोध आहे का?

**शरद जोशी :** त्याचा सध्याचा जो फॉर्म आहे, त्याला विरोध आहे. फर्स्ट अॅमेंडमेंटला आमचा विरोध आहे. त्याला नव्या शेड्यूल्डमध्ये घालण्यात आले, त्याला तर सक्त विरोध आहे.

**संगोराम :** तुम्ही एका बाजूला म्हणता की शेतकऱ्यांना एक्झिट पॉलिसी असली पाहिजे. दुसऱ्या बाजूला तुम्ही म्हणता शरद पवार शेतकऱ्यांना शेती करूच नका, असं म्हणतात. तर मग यापुढील पन्नास वर्षांत भारतातील अन्नधान्याच्या उत्पादनाचे पर्यायाने शेतीचे भविष्य काय असेल ?

**शरद जोशी :** एका शब्दात महादुष्काळ !

**संगोराम :** यातून बाहेर कसे पडता येईल, त्याचा मार्ग काय?

**शरद जोशी :** हे सहज शक्य आहे. शेतीमालाला योग्य भाव द्यायला सुरुवात करा, म्हणजे बाजारातला हस्तक्षेप कमी केला. तर, तुम्हाला जादूची कांडी फिरल्यासारखा चमत्कार दिसेल. शेतकरी विरोधी जी धोरणे आहेत. त्यात इथेनॉल बंदी हे धोरण आहे. हे जर तुम्ही पाळले तर शेतकी क्रांती जरूर घडून येईल.

**कुबेर :** आयएमएफ ओरिएंटेड इकानॉमी असणे हा त्याच्याशीच निगडित असतो का?

**शरद जोशी :** आयएमएफचा काही संबंध यात येत नाही. शेतकऱ्यांना दोन स्वातंत्र्ये हवी आहेत. तंत्रज्ञानाचे स्वातंत्र्य आणि बाजाराचे स्वातंत्र्य, याखेरीज काही देण्याची गरज नाही. शेतकरी संघटनेचा हा गाभा आहे. बाकी घामाचं दाम आम्ही आमचं कमावतो.

**कुबेर :** आयएमएफचा मुद्दा मी जो म्हणत होतो की, आपल्या देशातील धोरणकर्ती मंडळी त्या अनुषंगाने विचार करतात का? या गोष्टी त्यांना का कळत नाहीत.

**शरद जोशी :** तुम्ही आयएमएफ का म्हणता? मी त्याला डून स्कूल म्हणतो. हिंदुस्थान डून स्कूलवाल्यांचा आहे. त्यांचे वाचन फक्त यस प्राईम मिनिस्टर व यस मिनिस्टरपर्यंतच होतं, असे मी माझ्या लेखनात म्हटले आहे. त्या लोकांचं जे काही वाचन आहे, जे पर्स्पेक्टिव्ह होतं, त्या तऱ्हेचे पर्स्पेक्टिव्ह राजीव गांधी यांच्याकडे तर नव्हतेच, आताचा राहुल गांधी त्यापेक्षाही वाईट आहे. तुम्हाला हे मी आत्ताच सांगून ठेवतो.

*(साभार - दै. लोकसत्ता, दि. १ एप्रिल २०१०)*

■■

# शरद जोशी - अतुलनीय स्वतंत्रतावादी

**श्री. एस. व्ही. राजू** (सरचिटणीस, स्वतंत्र पार्टी)
अनुवाद - प्रा. विश्वास तांबोळी



सी. राजगोपालचारी यांनी स्थापन केलेल्या स्वतंत्र पक्षाचे सरचिटणीस
**श्री. एस. व्ही. राजू**

*मा. शरद जोशी यांना चतुरंग प्रतिष्ठानने 'जीवनगौरव' पुरस्कार देऊन गौरविले. या निमित्त या संस्थेने विशेष दैनंदिनी प्रकाशित केली. या दैनंदिनीतील मा. एस. व्ही. राजू यांच्या इंग्रजी लेखाचा प्रा. विश्वास तांबोळी यांनी केलेला अनुवाद संघटकच्या वाचकांसाठी प्रसिद्ध करीत आहोत. शेतकरी संघटनेच्या व्यापात स्वतंत्रतावादी विचारांचा पाठपुरावा करणे शरद जोशी आणि शेतकरी संघटनेला शक्य झाले नाही. या विषयावर राजू यांचे योगदान महत्त्वाचे आहे हे लक्षात घ्यायला हवे.*

१९९३ च्या सुरुवातीच्या काळात एका रविवारी तेव्हाचे आमदार व महाराष्ट्र विधानसभेचे उपसभापती श्री. मोरेश्वर टेमुर्डे मला भेटायला आले. स्वतःचा परिचय करून दिल्यानंतर त्यांनी विचारले की, 'स्वतंत्र पार्टी अजूनही देशाच्या राजकीय मंचावर अस्तित्वात आहे काय?' शेतकरी संघटनेचे संस्थापक नेते श्री. शरद जोशी यांना या संदर्भातील माहिती हवी आहे असा त्यांनी खुलासा केला. स्वतंत्र पार्टीचे अस्तित्त्व एव्हाना संपुष्टात आले असावे अशी सर्वसाधारण धारणा आहे असेही ते म्हणाले.

'महाराष्ट्रात स्वतंत्र पार्टीचे अस्तित्त्व केवळ नाममात्र आहे' असे स्पष्टीकरण मी त्यांना दिले. सदर पार्टीचे हाडाचे सदस्य पार्टीचे पुनरुज्जीवन करण्याची धडपड करीत असल्याचेही मी त्यांना सांगितले. खरे तर आम्ही त्या जुन्या पक्षाचे राखणदार होतो. शरद जोशींसारख्या तोलामोलाच्या नेत्यांकडून अशा प्रकारची चौकशी होते आहे ही आमच्या दृष्टीने एक उत्साहवर्धक बाब होती. सत्तरच्या दशकाच्या उत्तरार्धातील, शेतकरी संघटनेची घोडदौड, शरद जोशी यांचा शेतकऱ्यांचा एक प्रभावी नेता म्हणून झालेला उदय आणि त्यांची 'भारत-इंडिया' द्वैतसंकल्पना याबद्दल आम्ही बरेच ऐकून होतो. म्हणून, अधिक चर्चा करण्याच्या दृष्टीने शरद जोशींच्या सोयीप्रमाणे त्यांच्या भेटीला येत असल्याचे त्यांना कळवले. त्याप्रमाणे सुमारे एक आठवड्यानंतर तेव्हाचे महाराष्ट्र स्वतंत्र पार्टीचे कार्यवाह श्री. एल. आर. संपत आणि मी आंबेठाणकडे रवाना झालो. मुंबईपासून सुमारे शंभर किलोमीटरवर, पुणे जिल्ह्यातील चाकणजवळ आंबेठाण हे एक खेडेवजा गाव आहे. नंतर झालेल्या अनेक भेटींपैकी ही आमची पहिली भेट होती. आम्ही दोघेही शरद जोशींच्या या भेटीने खूपच प्रभावित झालो. सत्तरच्या दशकाच्या सुरुवातीनंतर प्रथमच मी राजाजी-मसानी यांच्या समान विचारधारेच्या प्रज्ञावंताला भेटत होतो.

ही आंबेठाण बैठक ही शरद जोशींबरोबर आमनेसामने अशा स्वरूपाची पहिलीच बैठक होती. त्याआधी १५ मार्च १९८७ रोजी म्हणजे या बैठकीच्या सात वर्षे आधी आणि आजच्या हिशोबाने सुमारे तीन दशकांपूर्वी मुंबईत हॉटेल ताज इंटरनॅशनलमध्ये त्यांनी लेस्ली सॉनी लोकशाही प्रशिक्षण कार्यक्रमाच्या माजी विद्यार्थ्यांसमोर दिलेले व्याख्यान मी ऐकले होते. भारतातील स्वतंत्रतावादाच्या अवस्थेचे ते एक तेजस्वी बुद्धिमान विश्लेषण होते. 'भारताला द्वितीय गणराज्याची आवश्यकता का आहे?' असा त्या व्याख्यानाचा विषय होता. 'फ्रीडम फर्स्ट'च्या जुलै-सप्टेंबर १९८७ च्या अंकात आम्ही ते भाषण प्रकाशित केले होते. स्वतंत्रतावादाचा पुरस्कार करणारे अशा स्वरूपाचे लेख प्रकाशित करणारे भारतातील ते एकमेव त्रैमासिक होते.

राजाजी व मीनू मसानी यांनी नेहरूप्रणीत समाजवादाला राजकीय मंचावरून सर्वप्रथम आव्हान दिले. त्यांना अनेक प्रज्ञावंतांचे पाठबळ मिळाले होते. अजोड अर्थशास्त्रज्ञ प्रा. बी. आर. शेणॉय यांचा सल्ला आणि मार्गदर्शन त्यांना लाभले होते. एच. एम. पटेल, नारायण दांडेकर आणि जे. एम. लोबोप्रभू यांच्यासारखे इंडियन सिव्हिल सर्व्हिसमधील दिग्गज व्यवस्थापनतज्ज्ञ त्यांच्या सोबत होते. आजच्या 'इंडियन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिस'ला त्या काळी 'इंडियन सिव्हिल सर्व्हिस' म्हणत असत. ज्यांनी पुढे भारतीय सांस्कृतिक क्षेत्रात प्रवेश करून 'भारतीय विद्याभवन'ची स्थापना केली ते के. एम. मुन्शी तसेच एक ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ व माजी केंद्रीय कृषिमंत्री श्री. एम. रामस्वामी हेही त्यांच्या सोबत होते. यांच्यापैकी एक प्रा. शेणॉय वगळता बाकी सर्व राजाजींनी स्थापन केलेल्या स्वतंत्र पार्टीत सामील झाले व तिच्या राष्ट्रीय कृतीसमितीचेही सदस्य झाले. राजाजी-मसानींनंतर प्रदीर्घ काळाने नेहरूप्रणीत समाजवादाला आव्हान देणाऱ्या शरद जोशींच्या मागे मात्र असे काही पाठबळ नव्हते.

शरद जोशींच्या स्वतंत्रतावादासंबंधी तत्त्वज्ञानाच्या अधिकाराबद्दल तसेच स्वातंत्र्य हे कशासाठी असते या संकल्पनेच्या संबंधी विचाराच्या स्पष्टतेबद्दल संशय घ्यायला थोडीही जागा नाही. जुन्या स्वतंत्र पार्टीतील त्यांच्या पूर्वजांची बौद्धिक क्षमता त्यांच्यात आहे. वर उल्लेख केलेल्या यादीतील व्यक्तींच्या महत्तेचा अनुभव घेण्याचे भाग्य लाभलेल्या माझ्यासारख्याच्या मनात, स्वतंत्र पार्टी भरात होती त्या साठच्या दशकात शरद जोशी जरी वयाच्या पंचविशीत असले तरी ते स्वाभाविकपणे या यादीतील व्यक्तींच्या पंक्तीत बसू शकले असते असे म्हणताना किंचितही संभ्रम येत नाही.

शरद जोशींमध्ये एक असे सामर्थ्य आहे जे वरीलपैकी कोणाही दिग्गजामध्ये नव्हते आणि ते म्हणजे समूहमन खेचून घेण्याची क्षमता. स्वतंत्रतावादी नेत्यांमध्ये ती अभावानेच आढळते. लक्षावधींच्या मेळाव्यावर पकड मिळविणे हे त्यांच्यापैकी कोणालाही शक्य नव्हते - अगदी राजाजींनासुद्धा. शरद जोशींना पाहण्या-भेटण्यासाठी, ऐकण्यासाठी लक्षावधी लोक स्वतः होऊन येतात. त्यात पुरुष, महिला -अगदी लहान मुलांना कडेवर घेऊन - लांबलांबून मिळेल त्या मार्गाने



**१५ मार्च १९८७ रोजी हॉटेल ताज इंटरनॅशनल येथे मा. शरद जोशी यांच्या व्याख्यानप्रसंगी मा. मीनू मसानी व जे.आर.डी. टाटांसमवेत चर्चा करताना श्री. शरद जोशी**

येतात. शरद जोशींच्या दर्शनाची व भाषणाची वाट पाहताना घरून आणलेली शिदोरी खातात किंवा तेथेच तीन दगडांच्या चुली करून अन्न रांधून खातात. त्यांना भेडसावणाऱ्या समस्यांवर, मग त्या कांद्यासंबंधी असोत, उसासंबंधी असोत, स्त्रियांना मिळणाऱ्या दुय्यम वागणुकीसंबंधी असोत की दारूचे गुत्ते बंद करण्यासंबंधी असोत, त्यांना शरद जोशींच्या मार्गदर्शनाची आस लागलेली असते. जोशी काही जमावाला भडकावणारे नाहीत, ते राजाजी-मसानीप्रमाणेच जमावाला एखाद्या शाळामास्तरच्या कौशल्याने शिकविणारे तळमळीचे शिक्षक आहेत. ते अशा गोष्टी जमावासमोर बोलतात ज्या केवळ एखादा स्वतंत्रतावादीच बोलू शकतो. 'स्वतंत्रतावादाची मूल्ये ही एखाद्या बशीत साठलेल्या पाण्याइतकी चैतन्यहीन असतात' असे कुणीसे म्हटल्याचे मी ऐकले आहे; पण अत्यंत गुंतागुंतीची गृहीतकेसुद्धा अगदी सोप्या व समजण्यास सुकर अशा भाषेत मांडण्याची हातोटी जोशींना लाभली आहे. निदान दोन प्रसंगी असे घडताना मी पाहिलं आहे. १९९४मध्ये अकोल्याला आणि त्याच सुमारास नागपूरला. ग्रामीण भारतातील अशिक्षित, किंबहुना निरक्षर शेतकऱ्यांना समजू शकेल अशा भाषेत स्वतंत्रतावादाची तत्त्वे आणि धोरणे सांगितली जाताना मी अन्यत्र कोठेच पाहिलेले नाही.

'सबसिडी' हा प्रकार स्वतंत्रतावाद्यांना फारसा मान्य नाही. त्या मागचे कारण मात्र स्पष्ट करून सांगण्याचा प्रयत्न त्यांनी कधी केलेला दिसत नाही. अशा सबसिडीजमुळे शेतकरी जन्मभर दरिद्रीच राहून शासनाचा, पर्यायाने राजकीय पुढाऱ्यांचा कायम मिंधा किंवा आश्रित राहील असे जोशी ज्या तऱ्हेने शेतकऱ्यांना पटवून देतात त्या तऱ्हेने त्यांच्यापैकी काहींना करता आले असते. अगदी साठच्या दशकाच्या मध्य व उत्तरार्धाच्या स्वतंत्र पार्टीच्या घोडदौडीच्या काळातही असे घडलेले नव्हते.

शरद जोशी ज्यांच्यासमोर बोलतात त्यांच्या भावनांच्या तारा छेडण्याची क्षमता त्यांच्यामध्ये आहे. त्यांनी अनेक आंदोलने उभी केली, चालवली. एक स्वतंत्रतावादी म्हणून हिंसा त्यांना निषिद्ध आहेच. पण रेल्वेमार्गावर बसून चालत्या गाड्या थांबवण्यासारखे किंवा 'रास्ता रोको' करून चालती वाहने थांबवण्यासारखे, ज्याला 'चक्का जाम'ही म्हटले जाते, अहिंसक निषेधाचे आंदोलन करण्याला त्यांचा विरोध असत नाही. कायदा व सुव्यवस्थेला बाधा आणणे स्वतंत्रतावादाला मान्य नाही उलट कायद्याच्या राज्याप्रती त्याची बांधिलकी असते; पण जेव्हा इतर सर्व मार्ग खुंटलेले असतील आणि आपले म्हणणे जगासमोर ठेवणे अत्यंत आवश्यक असेल तेव्हा त्यांचे रस्त्यावर उतरणे योग्यच आहे असे, एक स्वतंत्रतावादी असलो तरी, मलाही पटू लागले आहे. शरद जोशी कोण्या पक्षाचे वा पार्टीचे नसल्यामुळे ग्रामीण जनतेचा अपार विश्वास त्यांना प्राप्त करता आला.

'इतरांनी आपला मान राखावा असे वाटत असल्यास प्रथम आपणच आपला मान राखला पाहिजे' असा आत्मसन्मानाचा विश्वास शरद जोशींनी शेतकऱ्यांच्या मनात पेरला आणि रुजवला. लोक त्यांचे म्हणणे ऐकतात कारण लोकांचा त्यांच्यावर विश्वास आहे.

स्वतंत्रतावाद्यांचे दुसरे वैशिष्ट्य. 'शेतकऱ्यांच्या जन्मच सेवेसाठी असतो. देशाला अन्न पुरविणे हे त्यांचे कर्तव्यच आहे आणि त्यासाठी अन्नधान्ये पिकवणे हा त्यांचा धर्म आहे.' असा समाजवाद्यांनी पुरस्कृत केलेला समज. या गैरसमजाला सुरुंग लावण्याचे कार्य शरद जोशींनी केले. एकदा संत्र्याच्या किंमती आभाळाला भिडल्याबद्दलची तक्रार मी त्यांच्या उपस्थितीतच उघडपणे केली. खुल्या बाजारपेठेचा पुरस्कार करणारे असल्यामुळे शरद जोशी म्हणू शकले असते की हा सगळा मागणीपुरवठ्याचा प्रश्न आहे. पण ते तसे म्हणाले नाहीत. त्यांनी सरळसरळ विचारले, 'एका सिगरेटच्या पाकिटासाठी किंवा कोकाकोलाच्या बाटलीसाठी दहा रुपये मोजताना तुम्ही दोनदा विचार करता का? मग जेव्हा एखादा शेतकरी त्याच्या उत्पादनावर नफा कमावण्याच्या उद्देशाने त्याची संत्री विकण्याचा प्रयत्न करतो तेव्हा का तक्रार करता? शेतकरी हा सेवेसाठीच जन्मलेला असतो या समाजवादी विचारांनी खतपाणी घातलेल्या मानसिक धारणेतूनच हे घडते. आपले उत्पादन कोणत्या भावाने विकावे हे ठरविण्याचा अधिकार शेतकऱ्यांना नाही. हेच केंद्र व राज्य शासनांच्या शेतकरीविरोधी धोरणांच्या मुळाशी आहे आणि त्यामुळेच देशाचा साठ टक्के भाग ओघानेच 'भारत' अवस्थेत राहातो.'

जसजशा घटना घडत गेल्या तसतसे शरद जोशींनी केलेले स्वतंत्रतावादाचे एकमेवाद्वितीय व समकालीन स्पष्टीकरण समोर येऊ लागले. कट्टर स्वतंत्रतावाद्याप्रमाणे, जे बोलणे आवश्यक आहे ते स्पष्टपणे बोलून टाकण्यास त्यांनी कधीच मागेपुढे पाहिले नाही. लाखालाखांच्या शेतकरी मेळाव्यात

**पान १४ पाहा**

# आकडेवारीचा खेळ मांडीयेला



ज्ञानेश्वर शेलार

**गेल्या दहा वर्षांत सिंचनावर ७० हजार कोटी रुपये, खर्च करण्यात आले आहेत. सिंचन १७.८ टक्क्यांहून १७.९ टक्क्यांवर म्हणजे फक्त ०.०१ एवढीच वाढ दहा वर्षांत झालेली आहे. दरवर्षीचा हिशेब केला तर, एका वर्षाची वाढ किती होईल? हे आता कुणीतरी करून पाहायला हवे! येत्या वर्षात १८ हजार विहिरी खोदण्याचाही संकल्प अर्थसंकल्पात सोडण्यात आला आहे. अगोदरच एकीकडे पाणी पातळी तीनशे फुटांपर्यंत खाली गेलेली विजेचे भारनियमन बजेटच्या दुसऱ्याच दिवशी १२ तासांवरून १८ तास करण्याचे सरकारची घोषणा पाहिली तर विहिरी खोदणे, त्यांना पाणी लागणे आणि त्यांना वीज मिळणे या गोष्टींचा ताळमेळ कधी बसेल असे वाटत नाही.**

कॉलेजमध्ये शिकत असताना अर्थशास्त्राच्या अभ्यासक्रमात भारतात रेल्वे आल्यापासून स्वातंत्र्य मिळेपर्यंतचा रेल्वेचा आर्थिक इतिहास विमा कंपन्या त्यांच्या एकत्रीकरणातून राष्ट्रीयीकरण करून तयार करण्यात आलेली एलआयसी, बँकींग आणि ब्रिटिश काळात खाजगी आणि सरकारी बँका यांचा इतिहास असे अर्थशास्त्र अभ्यासाला होते. अर्थशास्त्र म्हणजे अर्थशास्त्राचा इतिहास असे त्याचे स्वरूप असायचे. त्यातही नेमके शेतीच्या आर्थिक इतिहासाची कोठेही नोंद नव्हती. कदाचित इतर काही अभ्यासक्रमांमध्ये ती असूही शकेल. तसा अर्थशास्त्र हा काही फार रंजक आणि आकर्षक विषय वाटला नाही. मात्र जसजसा शेतकरी संघटनेशी संबंध येत गेला, तसतसा अर्थशास्त्राविषयी आपोआपच जिव्हाळा निर्माण झाला. शेतीचे अर्थशास्त्र तर शेतकरी संघटनेचे तळागाळातील सगळेच बिल्लेधारी मांडू लागले. आपापल्या शेतीतील खर्चाचा जमेचा आणि नफ्या-तोट्याचा ताळेबंद म्हणजेच अर्थशास्त्र हे सगळ्यांनाच समजू लागले. या वर्षी जेव्हा केंद्रीय अंदाजपत्रक जाहिर झाले. त्यावेळी नेमके शेतीसाठी काय मिळाले, यावर सारखे लक्ष जात होते. राज्याचा अर्थसंकल्प सादर झाला तेव्हाही शेतीकडेच लक्ष आपोआपच वेधले गेले. अजित पवार विधानसभेत अर्थसंकल्प वाचू शकतात याचा अर्थ आपल्यालाही तो थोडा थोडा समजेल असा आत्मविश्वास शेतकरी संघटनेच्या कामातून निर्माण झालेला होताच. त्याच आत्मविश्वासाने थोडीफार आकडेवारीची जुळवाजुळव केली तर अर्थसंकल्प ही काही अर्थबोध न होणारी दुर्बोध संकल्पना आहे असे वाटले नाही.

केंद्रीय बजेट सादर झाल्यानंतर आणि त्याच्या अगोदरही सगळीकडे चर्चा होती, ती इन्कम टॅक्समध्ये किती सूट मिळणार? १ लाख ८० हजारांवरून २ लाख, ३ लाख की ५ लाखांपर्यंत? बजेटच्या अगोदर वेगवेगळ्या समित्यांनी अर्थमंत्र्यांकडे केलेल्या शिफारसींमध्ये ५ लाखांपर्यंतच्या सुटीची शिफारस करण्यात आली होती. नोकरदार वर्ग या शिफारसी बघून फारच हुरळून गेल्यासारखा झाला होता. बजेट सादर झाल्यानंतर फक्त २० हजारांची मर्यादा वाढवण्यात आली. बजेट जणू काही पूर्णपणे या इन्कम टॅक्सच्या सुटीभोवतीच फिरत होते असे वाटले. इतर तरतूदींकडे खरोखरच लोक अर्थात नागरिक फारसे गांभीर्याने पाहत नाहीत हेही निदर्शनास आले. आपल्याला काय मिळाले, एवढाच आकडा पाहणे म्हणजे अर्थसंकल्प पाहणे अशी संकल्पना बहुतेक सर्वांच्याच मनात रुजलेली आहे.

राज्याचे बजेट जाहीर झाल्यानंतर मोठा गदारोळ उडाला आणि त्याचे कारण होते फक्त गॅस सिलेंडरवर ५ टक्के कर लावणे. नंतरचे तीन-चार दिवस सतत गॅस सिलेंडरभोवतीच सर्व बजेट फिरत होते. वृत्तवाहिन्या महिलांच्या आणि सर्वसामान्यांच्या मुलाखती घेत होत्या. सिलेंडरवर ५ टक्के कर लावल्यास साधारणपणे २० रुपये महिन्याला जादा मोजावे लागणार होते; परंतु त्यामुळे सर्व कुटुंबाचेच अंदाजपत्रक चुकणार. सर्वसामान्य आणि मध्यमवर्गीयांचे जीणे मुश्किल होणार, अशा प्रतिक्रिया २४ तास दाखविण्यात आल्या. सुरुवातीला विरोधी पक्षांनी या करांविषयी तीव्र नाराजी व्यक्त केली. मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. ही करवाढ मागे घ्यावी लागेल, असा अंदाज येताच ज्या पक्षाच्या अर्थमंत्र्यांनी बजेट मांडले. त्यांनाही मोठीच संधी आहे, असे दिसले. खुद्द राष्ट्रवादीच्या आमदारांनी तिसऱ्या दिवशी ताबडतोब अजित पवारांची आणि मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन आपल्या भावना कळविल्यात आणि त्यांनीही तात्काळ करवाढ रद्द केली. राष्ट्रवादीमुळे प्रत्येक सामान्य माणसाच्या घरातील बिघडलेले बजेट ताळ्यावर आले, हा संदेश तडकाफडकी घराघरात पोहोचला. सामान्यांसाठी वेळोवेळी आपल्याच पक्षाशी विरोध घेऊ किंवा आपणच केलेल्या घोषणाही आपण मागे घ्यायला लावू एवढा कणखरपणा पक्षात आहे, हे दाखवून देण्याची संधी राष्ट्रवादीने घेतली. फार पूर्वी जेव्हा बजेट थोडेफार वाचण्याचा प्रयत्न केला तेव्हा एका बजेटमध्ये छत्रीच्या काड्यांवरील कर कमी करण्यात आला आहे वगैरे अशा तरतुदीही वर्तमानपत्रांत छापून आल्याचे स्मरते. त्यावेळी सरकारचे किती बारीक लक्ष असते आणि छत्रीच्या काड्यांपासून तर विमाने, रणगाडे आणि काड्यांच्या पेट्या यांच्यावरही किती बारीकसारीक हिशेब करावा लागत असेल आणि तोही संपूर्ण देशाचा याचे मोठे कौतुक वाटायचे. तिथे बसलेली माणसेही काय लायकीची असतील हे बघून आश्चर्यही वाटायचे. या बजेटमध्येही काजळावरील कर कमी करण्यात आल्याचे वर्तमानपत्रात छापून आले. सरकारचे किती बारीक लक्ष आहे हे डोळे उघडे असलेल्या सर्व नागरिकांना खरे म्हणजे कळायला हवे, पण हल्ली काजळ वापरतो कोण? आणि सरकारच्या कर्तृत्वाकडे लक्ष ठेवायला काजळ घालून कोण बसतो? नागरिकांना कोठे एवढा वेळ आहे.

मागील वर्षी ५८ कोटींचे शिलकी अंदाजपत्रक या वर्षी दोन हजार कोटींच्या तुटीचे झाले आहे. ही तूट सोयाबीन, कापूस, धान उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या आत्महत्या थांबाव्यात म्हणून देण्यात आलेल्या विशेष पॅकेजसाठी जे २ हजार कोटी रुपये सरकारने खर्च केले, त्यामुळे आलेली आहे, असे समर्थन अर्थमंत्र्यांनी केले. शेतीसाठी केलेल्या तरतुदींमध्ये लघु पाटबंधारे योजना ८० कोटी रुपये, कोरडवाहू शेतीसाठी २०० कोटी रुपये, अन्नधान्य योजना ७ कोटी रुपये, कृषीपंप बसवण्यासाठी १०८५ कोटी रुपये, गोदाम उभारणीसाठी २ हजार २५ कोटी रुपये अशा ठळक योजना आहेत. शेतकऱ्यांना थकीत वीज बिलाच्या अर्धे वीज बिलही माफ करण्यात येणार आहे. या सर्व तरतुदींकरिता

सर्व प्रसार माध्यमांनी शेतीला आणि उद्योगांना चालना देणारे बजेट अशी जी प्रसिद्धी केली आहे ती येत्या वर्षात शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबतील की वाढतील या एकाच निकषाने कळून येणार आहेत. शेतीसाठी केलेली तरतूद ही किती तुटपूंजी आहे हे बघायचे असेल, तर केवळ एकाच आकडेवारीवरून कळून येईल. गेल्या दहा वर्षांत सिंचनावर ७० हजार कोटी रुपये, खर्च करण्यात आले आहेत. सिंचन १७.८ टक्क्यांहून १७.९ टक्क्यांवर म्हणजे फक्त ०.०१ एवढीच वाढ दहा वर्षांत झालेली आहे. दरवर्षीचा हिशेब केला तर, एका वर्षाची वाढ किती होईल? हे आता कुणीतरी करून पाहायला हवे! येत्या वर्षात १८ हजार विहिरी खोदण्याचाही संकल्प अर्थसंकल्पात सोडण्यात आला आहे. अगोदरच एकीकडे पाणी पातळी तीनशे फुटांपर्यंत खाली गेलेली विजेचे भारनियमन बजेटच्या दुसऱ्याच दिवशी १२ तासांवरून १८ तास करण्याचे सरकारची घोषणा पाहिली तर विहिरी खोदणे, त्यांना पाणी लागणे आणि त्यांना वीज मिळणे या गोष्टींचा ताळमेळ कधी बसेल असे वाटत नाही.

कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे संगणकीकरण करण्यासाठीही काही तरतूद बजेटमध्ये करण्यात आली आहे. ही तरतूदही छत्रीच्या काड्यांवरील किंवा काजळावरील कर काढून टाकण्यासारखेच आहे. मुळातच संपूर्ण बाजारसमितीचा कारभार एका तीस हजाराच्या संगणकावर मावू शकेल, असे संगणक सध्या बाजारात उपलब्ध आहेत. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालकांना विद्यार्थी वापरतात तसा २ ते अडीच हजारांचा 'आकाश'सारखा टॅब्लेट पीसी दिला तरी पंचवीस-तीस हजार आणखी खर्च होतील. कृषी उत्पन्न बाजार समित्या मुळात उत्पन्नाचे साधन असताना त्यांना सरकारने संगणक देऊन संगणकीकरणाचा गाजावाजा करण्यासारखे काहीही नाही. काही बाष्कळ तरतूदी अशाच पद्धतीने केवळ शेतीच्या नावावर किंवा शेती विकासाच्या नावावर खपवण्यात आलेल्या आहेत. एकूण जमा होणाऱ्या करांच्या रकमेपैकी आजही ६३ टक्के निधी पगारावर खर्च होतो. म्हणजेच सरकार चालवण्यावर १३ टक्के रक्कम कर्जाचे हप्ते व व्याज देण्यासाठी लागणार आहे. विकासासाठी फक्त २४ टक्के रक्कम शिल्लक राहणार आहे. या रकमेतूनच वीज-पाणी-रस्ते शिक्षण आरोग्य भागवायचे आहे. आता विकासासाठी काय वाट्याला येईल ते फारच थोडे असेल. सिंचन, रस्ते यांच्यावर मोठ्या प्रमाणावर रक्कम खर्ची घालण्यात येणार असल्याचे आकडे बजेटमध्ये दिसतात. प्रत्यक्षात सिंचनाच्या नवीन सोयी, नवीन रस्ते असे काहीही तयार होत नाही. जुन्या कालव्यांची अन् चाऱ्यांची डागडुजी, जुन्या रस्त्यांचेच दरवर्षी नुतनीकरण असे चक्र चालू आहे. कार्यकर्त्यांना कॉंट्रॅक्टर बनवण्यासाठी ही सर्व रक्कम खर्ची पडणार आहे. पंचायत समित्या, जिल्हा परिषदांच्या निवडणुकांअगोदर निवडणुकीच्या अगोदर बऱ्याच उमेदवारांची राष्ट्रवादीकडे धाव का होती, हे बजेट पाहिल्यानंतर आणि ते दादांनी मांडले आहे, हे लक्षात आल्यानंतर कळाले.

बजेट मांडण्याअगोदर राज्याने आर्थिक पाहणी अहवाल मांडला होता. या अहवालात शेतीचा विकासदर मागील वर्षीपेक्षा पाच टक्क्यांनी घटला असल्याचे निदर्शनास आले. आर्थिक पाहणी अहवालामध्ये उद्योग आणि सेवाक्षेत्राची मात्र भरभराट झाल्याचे दिसून आले. आर्थिक पाहणी विचारात घेऊन शेतीकडे विशेष लक्ष देण्यात येईल, असे वाटले होते; परंतु तसे काहीही झाले नाही. शेतीसाठीची परिस्थिती जैसे थे आहे. भविष्यकाळात असे आर्थिक पाहणी अहवाल करून कदाचित शेतकरी आणि शेती किती अडचणीत आहेत. याचे स्पष्ट चित्र समोर आल्यास हेच अहवाल शेतकऱ्यांची आणि शेतीची गळचेपी करण्यासाठी त्यांच्यावर विविध बंदी लावण्यासाठी तर होणार नाही ना, अशी भीती आता वाटायला लागली आहे.

महाराष्ट्र सरकारने बजेट अगोदर केलेल्या आर्थिक पाहणी अहवालात मागील वर्षी विकास कामांसाठी ज्या निधीची तरतूद करण्यात आली होती, त्यापैकी किती निधी वापरण्यात आला, याचा हिशेब मांडला असता ५० टक्के निधी पडून आहे, वापरलाच गेला नाही, असे निदर्शनास आले आहे. यामध्ये स्वतः मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कृषीमंत्री, वनमंत्री यांचाच त्यांच्या वाट्याला आलेल्या निधीपैकी ५० टक्के निधी वापराविना पडून असल्याचे निदर्शनास आले आहे. इतरांच्या निधीबद्दल काय बोलावे. अशा प्रकारचे बजेट निधी आणि त्याचा वापर असेल तर विकास कामे कधी होणार?

केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये मागील वर्षी शेती आणि संबंधित क्षेत्रासाठी २४,१७६.७२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. या वर्षी ती २७,९३१.५९ कोटी रुपये एवढी करण्यात आली आहे. यामध्ये वाढ झाल्याचे दिसत असले तरी खत, वीज, वाहतूक, मजुरी यांचे वाढलेले दर लक्षात घेता नवीन काही शेतीच्या वाट्याला आलेले नाही. रोजगार निर्मितीमध्ये शेतीचा वाटा ५८.२ टक्के तर निर्यातीमध्ये १०.५९ टक्के आहे. एकूण लोकसंख्येचा विचार करता शेतीच्या वाट्याला १४ ते १५ टक्केच रक्कम मिळते.

केंद्रीय अर्थसंकल्पात सबसिडी कमी करण्याचा सरकारचा निर्धार असल्याचे सांगण्यात आले. त्या अगोदर झालेल्या सर्व चर्चांमध्ये प्रणव मुखर्जींनी अशाच प्रकारचे संकेत दिले. आपण सबसिडी कमी करीत आहोत, असे एकीकडे बजेटमधील चित्र दाखविण्यातही ते यशस्वी झाले आहेत. तेलाच्या किमती बाजारभावाशी जोडणे हा त्यातला महत्त्वाचा मुद्दा आहे. प्रत्यक्षात मात्र सबसिडी कमी करण्याचे म्हणत असतानाच अन्नसुरक्षा विधेयकासाठी आग्रही राहून त्याच्या रूपाने मोठ्या प्रमाणावर सबसिडी देण्याचा सरकारने प्रयत्न केला आहे. अन्न सुरक्षा विधेयकाला फारसा कुणी निदान राजकीय पक्ष तरी विरोध करू शकत नाहीत, ही त्यामागील मेख आहे. अन्न सुरक्षा विधेयकाच्या आडून आपापल्या कार्यकर्त्यांच्या पोटापाण्याची सबसिडी चालू ठेवण्याचा हा मागील दाराने केलेला प्रयत्न आहे. सोनिया गांधींच्या कोंडाळ्यातील लोकांनी तर सुरुवातीला ४० टक्के नंतर ८५ टक्के आणि आता ९५ टक्के लोक अन्न सुरक्षा विधेयकाखाली आणण्यात यावेत, अशा प्रकारचे प्रयत्न चालू केले आहेत. या मागील उद्देश हा केवळ सबसिडी पदरात पाडून घेणे आणि तीही जनकल्याणाच्या नावे एवढाच आहे.

सरकारने मागील वर्षी निर्गुंतवणुकीचे उद्दीष्ट ३० हजार कोटी ठेवले होते. त्या पैकी फक्त १४ हजार कोटींची निर्गुंतवणूक झालेली आहे. या वर्षीचे उद्दीष्ट ४० हजार कोटी ठेवण्यात आले आहे. प्रत्यक्षात वर्षाच्या शेवटी २० हजार कोटींपर्यंत तरी, निर्गुंतवणूक होईल की नाही, हे मागील वर्षाचे उद्दीष्ट पाहता शक्य वाटत नाही. सरकारलाच उद्योगांतून बाहेर पडणे नको वाटते आहे की काय? असे वाटावे इतपत ते चिकटून बसले आहेत. त्याच वेळी शेतीत येणाऱ्या प्रत्यक्ष गुंतवणुकीचा मात्र बजेटमध्ये कोठेही उल्लेख करण्यात आलेला नाही. खतांवरील सबसिडी कारखानदारांना देण्याऐवजी ती प्रत्यक्ष शेतकऱ्यांनाच देण्याची सरकारची योजना आहे. त्यासाठी कोणती रचना केली जाईल, हे मात्र स्पष्ट करण्यात आलेले नाही. त्यामध्येही रेशन कार्ड, रेशनवरील धान्य, रोजगार हमी यांमध्ये होणाऱ्या घोटाळ्यांप्रमाणेच घोटाळेही वाढू शकतात. शेतकऱ्यांना आता निदान दुकानात जाऊन महागाने किंवा काळ्या बाजारात तरी खत मिळते, नवीन योजनेमध्ये चांगल्या प्रकारे अंमलबजावणी झाली नाही तर शेतात खत पडणे मुश्कील होणार आहे.

**ज्ञानेश्वर शेलार**
मो. ९२२६७९७०१८

■■

# शेतीचा अनर्थ - संकल्प

आज राज्यातील साठ टक्के लोकसंख्या शेतीशी संबंधित आहे. सकल उत्पन्नात सेवाक्षेत्राखाली परंतु औद्योगिक क्षेत्राबरोबरीने त्याचा वाटा आहे. रोजगार निर्मितीची अफाट क्षमता असणाऱ्या या कृषिक्षेत्राला दहा टक्केही वाट्याला येत नाही हे दुर्दैव आहे. आम्ही आमचे अर्थसंकल्पीय काम केले आहे, शेतकरी जगला, न जगला, ती आमची जबाबदारी नाही असे तर शासनाला या अर्थसंकल्पातून सूचीत करायचे नाही?



गिरधर पाटील

देशातीलच नव्हे तर राज्यातील शेतीची अवस्था बिकट आहे हे समजण्यासाठी खरे म्हणजे राज्याच्या आर्थिक सर्वेक्षणापर्यंत वाट पाहण्याची काही एक गरज नव्हती. शेतीच्या विकासदराचे आकडे व महत्प्रयासानेही आटोक्यात न येणाऱ्या शेतकऱ्यांच्या घाऊक आत्महत्या त्यासाठी पुरेशा होत्या. या पार्श्वभूमीवर निदान शेतीकडे भरघोसपणे पाहिले जाईल अशी अपेक्षा होती; परंतु शेतीसाठी काही सहानुभूती वाटते आहे हे दिसण्याइतपतही या अर्थसंकल्पात काही तरतुदी नसल्याने शेतीसाठी हा अनर्थसंकल्प असल्याचे नाईलाजाने नमूद करावेसे वाटते.

अलीकडच्या साऱ्या अर्थसंकल्पातील आकडेवारी अर्थसंकल्प सादर करताना कितीही आकर्षक वाटली तरी नंतरच्या होणाऱ्या हस्तक्षेपामुळे ती तशी राहतेच असे नाही. दरवाढ, भाववाढ वा करवाढ ही अर्थसंकल्पाशिवाय केव्हाही होऊ शकते. शिवाय काही अपरिहार्य तरतुदी जसे प्रशासकीय खर्च, कर्जफेड शक्य झाली तर ठीक, नाही तर निदान व्याजाची तजवीज, अप्रत्यक्षरीत्या ओढवून घेतलेल्या जोखमी या साऱ्यांमुळे नियोजित खर्चावर तशी फार बंधने येतात. शिवाय योजनेतर खर्चांकडे राजकर्त्यांचा झुकता कल पाहता अशा अर्थसंकल्पांच्या आकडेवारीवर न जाता या अर्थसंकल्पामुळे राज्यातील विकासाला नेमकी कुठली दिशा मिळणार आहे हे शोधणे क्रमप्राप्त ठरते.

शेतीसाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधांचा विचार करता सिंचनाखेरीज फारसा विचार झालेला दिसत नाही. कृषी हा राज्याचा विषय असल्याने निदान ज्या प्राधान्याने या क्षेत्राच्या गरजांना स्पर्श करणे आवश्यक होते त्या गांभीर्याने त्या हाताळल्या गेलेल्या नाहीत. शेती हे एक उत्पादन असल्याने त्याला लागणारे भांडवल, बाजार व तंत्रज्ञान या पातळ्यांवर सर्वंकष विचार व मांडणी आवश्यक होती. भांडवली उपलब्धता, उत्पादन वाढ, मूल्यवृद्धी व मूल्यनिश्चिती करणारा सुदृढ बाजार, त्याला उपलब्ध असे प्रगत तंत्रज्ञान या साऱ्यांनी शेतीतील नफ्याचे प्रमाण वाढून भांडवलाची पूनर्भरणी याला लागणाऱ्या घटकांची तजवीज, अशी दिशा या अर्थसंकल्पात दिसायला हवी होती. केंद्राने आपल्या अर्थसंकल्पात कृषी पतपुरवठ्यासाठी भरघोस अशी वाढ केली आहे. त्याचा शेतकऱ्यांना फायदा होण्यासाठी सक्षम अशी बँकींग व्यवस्था असणे अत्यावश्यक आहे. मात्र पुरेशी पत नसल्याने राष्ट्रीयकृत बँका शेतकऱ्यांना उभे करीत नाहीत. एका माहितीनुसार कुठल्याही राष्ट्रीयकृत बँकेने मागीलवर्षीचे आपले कर्जवितरणाचे लक्ष्य पूर्ण केलेले नाही व त्याबद्दल त्यांना जाबही विचारण्यात आलेला नाही. महाराष्ट्रातील पतपुरवठ्याच्या पर्यायी व्यवस्थेचे नाबार्ड ते विविध कार्यकारी सोसायट्यापर्यंतचे सहकारी जाळे जवळजवळ कोसळलेले आहे. राज्यातील बऱ्याचशा जिल्हा सहकारी बँका, त्यांच्या शिखर बँकेसह शेवटचे आचके देताहेत आणि या हंगामात शेतकऱ्यांना पतपुरवठ्याचा गहन प्रश्न निर्माण होणार आहे. या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना सवलतीच्या दराने कर्ज तर जाऊ द्या, निदान बाजारभावाने कर्ज वितरण कसे करता येईल या सुविधेचा विचार करायला हवा होता.

शेतमालाला रास्त भाव मिळण्याच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या बाजार सुधारणांबद्दल चकार शब्द काढलेला नाही. निर्यात प्रोत्साहनाबाबत शेतीत निर्यातबंदी या अपवादाचा आताशा नियम झाल्याने त्याचाही कुठे उल्लेख नाही. खाजगी बाजार स्वबळावर उभे राहीपर्यंत सध्याच्या बाजार समित्यांमध्ये काही मूलभूत बदल करणे आवश्यक आहे असे शासनाला वाटतच नाही. वास्तवात शेतमाल साठवणूक, वितरण वा प्रक्रिया करण्याची जबाबदारी या बाजार समित्यांवर कायद्याने निर्धारित केलेली असल्याने शेवटी पर्यायाने या शासनावरच येते. सक्षम पुरवठा साखळ्या असणारी शीतगृहे, छाटणी व पॅकींग, वातानुकूलीत वाहने यामुळे काढणी पश्चात होणारे सुमारे तीस टक्के नुकसान वाचवता आले तर शेतकऱ्यांना आजच तीस टक्क्यांचा फायदा होऊ शकतो. लिलाव तोंडी केला काय वा संगणकाने केला काय, शेवटी शेतमालाला भाव काय मिळाला हेच महत्त्वाचे असल्याने बाजार समित्यांना लिलावासाठी संगणक पुरवण्याची घोषणा फसवी आहे. आज १५०० रूपयांना टॅब्लेट संगणक व संगणकाचे सारे गुणधर्म असणारे मोबाईल फोन उपलब्ध असल्याने रोज कोट्यावधींचा व्यवहार करणाऱ्या बाजार समित्यांना असे संगणक देणे हे हास्यास्पद वाटते.

१८००० विहिरींची घोषणाही अशीच फसवी आहे. भूगर्भातील पाण्याची पातळी इतकी खाली जाते आहे की असलेल्या विहिरींचे पाणी नाहीसे होत चालले आहे. जेथे जेथे पाणी लागण्याची शक्यता आहे अशा शक्यता शेतकऱ्यांनी अगोदरच पडताळल्या आहेत. शिवाय या १८००० विहिरींना पाणी लागल्याचे गृहीत धरले तरी भारनियमनाच्या काळात या पंपांना वीज कुठून देणार हा प्रश्न आहेच.

सिंचनक्षेत्रातही अशीच गोंधळाची परिस्थिती आहे. जी धरणे साठवण व वितरणाच्या बाबतीत सक्षम आहेत त्यातील पाणी शहरी पिण्यासाठी व

उद्योगासाठी राखीव असते. जागतिक बँकेच्या आदेशानुसार स्थापित पाणी वापर संस्थांचे राखीव पाणी, जे राज्यपालांच्या सहीने करार करून वैध व राखीव केलेले असते, त्यांना देणे कधीच बंद झाले आहे. आपल्या हक्काच्या पाण्यासाठी या साऱ्या पाणी वापर संस्था न्यायालयांचे उंबरठे झिजवताहेत. आजच्या अर्थसंकल्पात सिंचनासाठी केलेली तरतूद ही शेतकऱ्यांच्या नावाने दाखवली जात असली तरी प्रत्यक्षात आज ती पाटबंधारे खाते व त्यांच्या कंत्राटदारांसाठीच आहे. ज्यादिवशी या प्रकल्पांचे पाणी शेतकऱ्यांच्या शेतात येईल त्यादिवशी ती गुंतवणूक शेतकऱ्यांसाठी असल्याचे मानता येईल. कारण बऱ्याचशा प्रकल्पातील पाण्यावर उद्योगांचा डोळा आहे व त्यांचे तसे प्रयत्नही दिसताहेत. आज झालय काय की राजकीय स्पर्धा व हाव यांमुळे कुठलेही नियोजन नसलेले भरमसाट प्रकल्प अनिर्बंधपणे राज्याच्या आर्थिक क्षमतांचा विचार न करता राबवण्यात आले. ज्या धरणांमध्ये पाणी आहे त्यांना वितरिका नाहीत व जेथे वितरिका आहेत त्या धरणांमध्ये पाणी नाही. आजही सिंचनाच्या नावाने या अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदी शेतीसाठी ताबडतोबीने वापरात येऊ शकणाऱ्या प्रकल्पासाठीच वापरल्या जातील याची शाश्वती नाही.

आज राज्यातील साठ टक्के लोकसंख्या शेतीशी संबंधित आहे. सकल उत्पन्नात सेवाक्षेत्राखाली परंतु औद्योगिक क्षेत्राबरोबरीने त्याचा वाटा आहे. रोजगार निर्मितीची अफाट क्षमता असणाऱ्या या कृषिक्षेत्राला दहा टक्केही वाट्याला येत नाही हे दुर्दैव आहे. आम्ही आमचे अर्थसंकल्पीय काम केले आहे, शेतकरी जगला, न जगला, ती आमची जबाबदारी नाही असे तर शासनाला या अर्थसंकल्पातून सूचीत करायचे नाही?

■■

---

# आयडिया अनएक्स्चेंड्...

आयडिया एक्स्चेंजच्या माध्यमातून प्रसिद्ध उद्योगपती अजित गुलाबचंद यांची मुलाखत वाचली आणि यातील एक्स्चेंजचा भाग जो राहून गेला होता त्या निमित्ताने हे दोन शब्द.

लेखाची सुरुवातच कोणताही उद्योग हा समाजाची सेवा (खरे म्हणजे त्यांना गरज अपेक्षित असावी) करण्यासाठीच उभा राहत असतो या वादग्रस्त विधानाने झाल्याने पुढचा सारा लेख काळजीपूर्वक वाचणे हे ओघानेच आले आणि त्यातील बऱ्याच विधानांची दखल घेणेही क्रमप्राप्त ठरले.

त्यांनी सरकारची उद्योगविषयक धोरणे, अर्थव्यवस्था व आजच्या प्रशासनाची अवस्था यावरची मांडलेली त्यांची सारी मते ही बहुश्रूतच असून आजवर उदारमतवाद्यांनी मांडलेल्या मतांशी साधर्म्य साधणारी आहेत. ही मते मांडताना त्यांना प्रसिद्ध उदारमतवादी राजगोपालाचारी यांचा उल्लेख करणे क्रमप्राप्तच ठरले असले तरी त्याच साखळीतील हा विचार पुढे नेणारे प्रसिद्ध उद्योजक मिनू मसानी व आजवर त्यांच्या विचारांचा प्रसार करणाऱ्या फ्रिडम फर्स्ट या नियतकालिकाचे संपादक एस. व्ही. राजू व यावर सखोल अभ्यास असणारे अनेक अभ्यासक यांचा उल्लेख या एक्स्चेंजमध्ये करता येईल. त्यांनी व्यक्त केलेली सारी मते ही अत्यंत विस्ताराने व तपशीलवार या नियतकालिकांतून गेली कित्येक वर्षे मांडली जात आहेत. या निमित्ताने ती प्रकाशात आली. एवढेच नव्हे तर गेली काही वर्षे सरकारी अर्थसंकल्पाबरोबर अर्थ व उद्योगक्षेत्राच्या दृष्टीने आदर्श ठरावा असा तज्ज्ञांनी तयार केलेला समांतर अर्थसंकल्प प्रसिद्ध केला जात आहे. हे सारे सांगण्याचा एकमेव उद्देश हा आहे की, ही सारी मते मी काहीतरी वेगळे सांगतो आहे या अविर्भावात प्रकट होत असल्याने या क्षेत्रात काम करणाऱ्या या साऱ्या मंडळींवर अन्याय होऊ नये. शिवाय हे तत्त्वज्ञान आपल्या व्यवसायाचे ब्रीद असल्याचे कधी दिसून न आल्याने त्यावर त्यांचा कितपत विश्वास आहे हेही स्पष्ट होत नाही.

उद्योगक्षेत्रातील शासकीय हस्तक्षेपाचा उल्लेख त्यांनीच केल्याने बरे झाले. भारतीय उद्योग व सरकार यांच्यातील परस्पर संबंधावर अनेकवेळा लिहिले गेले आहे. नियोजन व नियंत्रणवादी धोरणांचा परिणाम म्हणून शासनाचा वरदहस्त असल्याशिवाय भारतात उद्योग करता येत नाही ही मानसिकता लायसन्स परमीट कोटा जाऊन खुलेपणा आला तरी भारतीय उद्योजकांच्या पचनी अजूनही पडत नाही. जोवर हा वरदहस्त सोईचा तोवर फायदे घेत राहायचे आणि गैरसोईचा ठरू लागताच गळा काढायचा हे अनेकवेळा घडले आहे. या संबंधात त्यांनी लवासाचा उल्लेख केला आहे. लवासा हे एक अत्यंत गुंतागुंतीचे वादग्रस्त प्रकरण आहे आणि त्याचे अस्तित्त्व, विकास व प्रगती केवळ उद्योजकीय क्षमतांमुळेच झाली आहे असे कदाचित अजित गुलाबचंदही म्हणू शकणार नाहीत. अजित गुलाबचंदांच्या क्षमता असणारे इतर कोणी उद्योजक महाराष्ट्रात नाहीत आणि साऱ्यांना समान संधी असताना स्पर्धेतून हा प्रकल्प अजित यांनी उभारला असेही झालेले नाही. गिरीस्थळांबरोबर नववसाहती, पर्यटन व कृषीप्रक्रीया उद्योगांना अदिवासी जमीनी घेता येतील हे शासनाचे धोरण कित्येक वर्षांपासूनचे आहे. कित्येक वर्षे सर्वसामान्यांना तर ते माहीतच (होऊ दिले) नव्हते. या धोरणांनुसार शासनाने या विविध क्षेत्रात इतर किती उद्योजकांना परवानग्या दिल्या हा एक संशोधनाचा विषय ठरावा. वास्तवात ही सारी क्षेत्रे नवउद्योजकांना आव्हानात्मक व आकर्षित करणारी असली तरी या साऱ्या धोरणांचा राजकारणी व त्यांच्या कंपन्यांना अदिवासींच्या जमिनी बळकावण्या पलीकडे झालेला नाही. या जमिनींवर सदरचे उद्योग न उभारल्यास मूळ मालकाला जमिनी परत करण्याचे प्रावधान होते. मात्र आदीवासी न्यायालयात गेल्यावर शासनाचे कायदाच बदलून या साऱ्यांना पूर्वलक्षी सवलती देऊन या जमिनी वाचवण्याचे महत्कर्म केले आहे.

प्रश्न शासनाच्या अशा धोरणांचा नसून अजित गुलाबचंदसारखे उद्योजक या खुलेपणातील बंदिस्तपणाबद्दल काय भूमिका घेतात याचा आहे. कृषिक्षेत्रात उदारमतवादाचा पुरस्कार करणारे मा.खा. शरद जोशी यांनी साऱ्या उद्योग जगताला व्यक्तीगत आणि जाहीर पातळीवर पत्र लिहून उद्योग व आर्थिकक्षेत्राला जाचक ठरणाऱ्या या व्यवस्थेबद्दल विचार करण्यासाठी एकत्र येण्याचे आवाहन केले होते. मात्र अशी स्वतंत्र भूमिका घ्यायला कोणीही उद्योग वा उद्योजक पुढे आला नाही. स्वतंत्र भूमिका घेतली की ती सेटींग बिघडवते ही या साऱ्यांची अडचण आहे हे सर्वश्रूतच आहे. त्याबद्दलही कोणाला काही हरकत असण्याचे कारण नाही मात्र तत्त्वज्ञानाचा आधार घेऊन आम्ही नाही त्यातले हा आव तरी त्यांनी आणू नये.

जकातीचा मुद्दा त्यांनी काढला आहे. गेली चाळीस वर्षे चालू असलेले हे आंदोलन गुलाबचंदाना माहीत नसावे असे वाटते. गेल्या आंदोलनात व्यापारीच नव्हे तर ग्राहक व शेतकरी या आंदोलनात उतरले. मात्र उद्योग क्षेत्र जाहीर भूमिका घेऊन या साऱ्यांच्या पाठीशी आले नाही. याच प्रश्नावरून बजाजांना त्यांचा स्वयंचलित दुचाकींचा पिंपरीचा कारखाना अन्यत्र हलवावा लागला.

मला वाटते उदारमतवादी तत्त्वज्ञान सांगतानाच लवासाला त्या पातळीवर नेऊन उद्योगांची कशी गळचेपी होते आहे हे सांगण्याचा हा सारा खटाटोप आहे. या साऱ्या चर्चेत मेधा पाटकरांनाही त्यांनी ओढले आहे. त्या काही मुद्दे घेऊन लढताहेत आणि त्यांचा तो अधिकारही आहे हे दाखवण्याइतपत आपण उदारमतवादी आहोत हे सांगण्याची संधीही त्यांनी गमावली आहे. त्यांच्या विमानप्रवासाचा व खर्चाचा उल्लेख तर अनाठायीच असून विमानाने फिरण्याचा हक्क केवळ उद्योजकांनाच आहे ही कोण बया विमानाने फिरायला लागली असा बालिश आरोपही त्यातून ध्वनित होतो.

एकंदरीत सरकार गरिबांना सक्षम न करता नाहक पोसत राहते हा त्यांचा आरोप मात्र उद्योगांसाठीही खरा ठरावा. खुलीकरणानंतर आजवर सरकारी संरक्षणात वाढलेल्या भारतीय उद्योगाच्या नाकातोंडात पाणी गेल्याने ते भांबावलेले आहेत. खरी स्पर्धा टाळून लेवल प्लेईंग फिल्डच्या नावाखाली अजूनही त्यांना संरक्षणाचीच अपेक्षा आहे. खरे म्हणजे गरिबांचे पोषण व उद्योगांना संरक्षण हे सरकारलेखी सारखेच. गरीब त्यांना मतांसाठी लागतात. ही मते हस्तगत करण्यासाठीची रसद उद्योग त्यांना पुरवतात. स्वबळावर, स्वकर्तृत्वावर उभे राहत आंतरराष्ट्रीय स्पर्धेत यशस्वी होण्याचे स्वप्न खरे होऊ शकेल असे मानणारा उद्योजक याबद्दल काही बोलला तर त्यावर विश्वास ठेवता येईल.

**डॉ. गिरधर पाटील**
http://girdhar-liberals.blogspot.com
girdhar.patil@gmail.com

■■

**शरद जोशी - अतुलनीय स्वतंत्रतावादी... पान क्र. ९ वरून पुढे**

बोलतानाही ते अशा पद्धतीने बोलतात की ते आपल्यातील प्रत्येकाशी बोलत आहेत अशी छाप श्रोत्यांच्या मनावर पडते. शरद जोशींच्या दृष्टीने 'व्यक्ती' महत्त्वाची आहे, 'समष्टी' नव्हे.

१५ मार्च १९८७ च्या त्यांच्या एका व्याख्यानाचा मी सुरुवातीला उल्लेख केला आहे. 'भारताला द्वितीय गणराज्याची आवश्यकता का आहे?' या विषयावरील या व्याख्यानात भारताच्या गणराज्यात काय चुकले आहे, काय चुकते आहे याचे निदान केल्यानंतर त्यांनी निष्कर्ष मांडला की भारताला कोणत्या गोष्टीची आवश्यकता असेल तर ती म्हणजे 'दुसरे गणराज्य.'

भारतीय संविधानाचा स्वीकार करून १९५० मध्ये जे अस्तित्वात आले ते 'पहिले गणराज्य.' त्यात अनेक चुकीच्या गोष्टी घडल्या. त्या आता दुरुस्त करणे आवश्यक आहे. कसे? मीनू मसानी राजकारणातून निवृत्त झाल्यानंतर बहुधा, शरद जोशी हे एकमेव सक्रीय स्वतंत्रतावादी होते. तेव्हा वरील स्पष्टीकरण त्यांनी केले आणि पहिल्या गणराज्यातील चुका दुरुस्त करण्यासाठी 'दुसऱ्या गणराज्या'चा आराखडा आपल्या त्या व्याख्यानाच्या शेवटी सर्वांसमोर ठेवला. त्याचा सारांशः

- भारत हा खंडप्राय देश असून त्यातील समाज वैविध्यपूर्ण आहे. त्यातील बहुतेक लोक अशा ठिकाणी राहतात की जेथे वर्षाच्या कोणत्याही ऋतूत संपर्क साधणेही कठीण आहे. बहुसख्य जनता दरिद्री, दबलेली आहे. राज्यकर्त्यांनी इतर अधिक प्रगत देशांतील त्यांच्या समकक्ष असणाऱ्यांशी स्वतःची तुलना करणे सोडून द्यावे हे अधिक श्रेयस्कर होय. केंद्रीभूत शासनासाठी आवश्यक असणारी संरचना भारताकडे अजिबातच उपलब्ध नाही. दळणवळण आणि संपर्क यंत्रणा ही बहुतकरून अभिजन भारतीयांच्या ताब्यात आहे. त्यामुळे कुठल्याही प्रकारचे सत्तेचे केंद्रीकरण त्याच वर्गाच्या फायद्याचे ठरते.
- निर्णय घेण्याची प्रक्रिया ही जेथे त्याची प्रत्यक्ष अंमबजावणी केली जाते त्या स्तरापर्यंत पोहोचावयास हवी किंवा शक्यतो तळागाळापर्यंत पोहोचावयास हवी. केंद्रीय संयुक्त शासनाने किमान बाबीच स्वतःच्या अखत्यारीत ठेवावयास हव्यात. उदाहरणार्थ, संरक्षण, परराष्ट्र धोरण, नाणेविषयक धोरण, आंतरराज्यीय समन्वय इत्यादि. केंद्रीय संघराज्याचा मूलभूत घटक म्हणून राज्यशासनाने सध्या केंद्रशासन घेत असलेल्या जबाबदाऱ्यांपैकी बहुतेक जबाबदाऱ्या पार पाडाव्या. विकासकामांचा मोठा वाटा जिल्हा पातळीवर किंवा त्याहूनही खालच्या पातळीवर सोपवावयास हवा. या दृष्टीने 'विकेंद्रीकरण' हा शब्द चुकीचा आहे; 'निर्णयप्रक्रिया राबविणाऱ्या केंद्रांचे यथार्थीकरण' असे त्याचे अधिक समर्पक वर्णन होऊ शकेल. संघराष्ट्राची लक्षणे ज्यातून खऱ्या अर्थाने प्रतीत होतील अशी राज्यघटना तयार करावी लागेल.
- आमचा देश हा, कदाचित, विभूतिपूजकांचा देश असेलही. ज्यांनी आमच्या देशाची 'नियती' घडविण्यासाठी मार्गदर्शन करावे असे महान नेते लाभण्याइतका आमचा देश, कदाचित, भाग्यवान असेलही. पण, अशा प्रकारचे परावलंबित्व आम्हाला केवळ हुकुमशाहीच्या दुष्परिणामांचा आघातप्रवण बनवू शकते, एवढेच नव्हे तर अतिरेक्यांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या वाढत्या जमातींच्या कारवायांना बळी पडण्यासारखी परिस्थितीही निर्माण करू शकते.
- एखाद्या पंतप्रधानास पदच्युत करणे व त्याच्या जागी दुसरा बसवणे याच्या इतके चांगले संरक्षण दुसरे कोणतेच असू शकत नाही. भारतासारख्या, प्रशासन करण्यास अत्यंत अवघड असलेल्या देशात एका पंतप्रधानास जास्तीत जास्त दोन सत्रे राज्य करू देणेच इष्ट होईल. प्रत्येकी एक वर्षच प्रधानमंत्रीपद चक्रनेमीक्रमाने सांभाळणाऱ्या मंत्र्यांचे एखादे मंत्रीमंडळ निर्माण करणे आपल्या राज्ययंत्रणेच्या व राज्यकर्त्यांच्या दृष्टीने अधिक हितकारक व परिणामकारक ठरू शकते.
- असे नवीन राष्ट्र 'निर्धार्मिक' या शब्दाच्या शब्दकोशीय अर्थाच्या खऱ्या अर्थानुसार निर्धार्मिक ठेवावे लागेल. सरकार व सरकारचे प्रतिनिधी यांना सार्वजनिक जीवनात सर्व प्रकारच्या धार्मिक मतप्रणालींबद्दल आपली अश्रद्धा व्यक्त करावी लागेल. मंदिरादि धार्मिक प्रार्थनास्थळांच्या वाऱ्या करणारा पंतप्रधान आपल्यासारख्या राष्ट्राच्या सुदृढ धोरणांना हानिकारक ठरू शकतो.
- सारांश, असे स्पष्ट होते की, पहिल्या भारतीय गणराज्याचे सर्वात मोठे दुःख असे आहे की गणराज्याच्या निर्मितीच्या वेळी भारत हा राष्ट्र या अर्थी 'एकमय लोक' नव्हता; तो अनेक जातीजमातींमध्ये विभागला गेलेला होता. त्यात एक वसाहतवादी दुजाभावी अर्थव्यवस्था अस्तित्वात होती. अश्या परिस्थितीत घटना व गणराज्य सुस्थापित करण्याचा ध्यास घेणे युक्त झाले असते. गेल्या चाळीस वर्षांत या सरकारने अगदी विरुद्ध दिशेने वाटचाल केली आणि अर्थव्यवस्थेचा दुजाभावीपणा अधिकाधिक ठळक केला. परिणामतः, प्रशासकीय यंत्रणा प्रदूषित होणे, गणराज्याच्या मूलभूत रचनेलाच क्षती पोहोचणे आणि देशात विघटनवादाचा राक्षस उभा होणे अश्या गोष्टी घडल्या. आता दारिद्र्य दूर करण्याकरिता सक्षम होण्यासाठी आणि त्यानंतर एक खरेखुरे गणराज्य उभे करण्यासाठी जनतेने, महात्मा फुले यांच्या शब्दांत सांगायचे तर, 'एकमय लोक' म्हणून एक राष्ट्र प्रयत्नपूर्वक उभे करणे.

**अनुवादक : प्रा. विश्वास त्र्यं. तांबोळी**
३, 'विश्वास' अपार्टमेंट्स् ,चेंढरे, अलिबाग
जि. रायगड ४०२२०१

■■

# शेतीक्षेत्राची मृत्युघंटा

**जमा आणि खर्च याच्यात मेळ नसण्याची तीन मूलभूत आणि महत्त्वाची कारणे जगजाहीर आहेत. पहिले कारण प्रशासन व नोकरशाहीवर होणार अमाप व अविवेकी खर्च, दुसरे कारण सूट आणि सबसिडी यावरील न पेलणारा खर्च आणि अनुत्पादक लोकानुनयी योजनांवरील वाढता खर्च. अर्थसंकल्प सादर करण्याआधी अर्थमंत्र्यांनी या खर्चामुळे आपली झोप उडाली असल्याचे विधान केले होते; पण तरीही झोप उडविणाऱ्या या खर्चात कपात करण्याची कोणतीही योजना आणि मनीषा केंद्रीय अर्थसंकल्पात नाही.**



सुधाकर जाधव

बालपणी मुले आईच्या किंवा आजीच्या मांडीवर डोके टेकवून गोष्ट सांगण्यासाठी आग्रह करीत. आज टीव्हीवरील कार्टून फिल्मने बऱ्याच आयांची आणि आज्यांची यातून सुटका केली असली तरी मुलांना झोपविण्यासाठी गोष्टींचे महत्त्व कमी झालेले नाही. गोष्ट ऐकताना मुले झोपी जातात ते मुळी त्यांना गोष्ट समजत नाही म्हणून! छोट्यांच्या बाबतीत आई-आजी यांच्या कथा जे काम करतात तेच काम मोठ्यांच्या बाबतीत भारतीय संसदेत दरवर्षी नेमाने सादर होणारा अर्थसंकल्प करीत असतो. समजत नसली तरी मुले गोष्ट ऐकण्यास जसे उत्सुक असतात तसेच समाजातील अनेक घटक कधीही न समजलेला अर्थसंकल्प पुन्हा ऐकण्यास उत्सुक असतात. आपल्याकडे आर्थिक साक्षरतेचे जे चिंताजनक प्रमाण आहे आणि त्याहूनही चिंताजनक आर्थिक साक्षरतेचा स्तर लक्षात घेतला म्हणजे पूर्ण अर्थसंकल्प कोणाला समजत असेल असा दावा करणे धाडसाचे ठरेल. ज्या संसदेत हा अर्थसंकल्प सादर होतो त्या संसदेतील सदस्यांची अर्थसंकल्प सादर होते वेळी साऱ्या देशाला दिसणारी दयनीय अवस्था देशातील आर्थिक साक्षरतेची कल्पना देऊन जाते. अर्थसंकल्प ऐकताना संसद सदस्यांची दयनीय अवस्था होत असेल तर सर्वसामान्यांच्या बाबतीत बोलायलाच नको. प्रत्येकच अर्थमंत्र्यांचे भाषण कंटाळवाणे होत असल्याने व लोकांचे लक्ष अर्थमंत्र्यांपेक्षा संसद सदस्य काय करतात यावर केंद्रीत होत असल्याने संसद सदस्यांना पूर्ण अर्थसंकल्प कान देऊन ऐकत असल्याचा आव आणावा लागतो; पण सर्वसामान्यांना तशी गरज नसते. त्यामुळे अर्थमंत्र्यांच्या दोन तासांच्या भाषणात त्यांच्याशी संबंधित विषय येईल तेव्हाच ते कान देऊन ऐकतात. त्यांच्यासाठी तोच पूर्ण अर्थसंकल्प असतो. हत्ती आणि आंधळ्याच्या गोष्टीप्रमाणे आम्ही अर्थसंकल्प समजून घेत असतो. आंधळा जसा हत्तीच्या ज्या अवयवाला स्पर्श करतो आणि त्यालाच पूर्ण हत्ती समजतो, तसेच आजच्या अर्थव्यवस्थेत जो ज्या बाजूला उभा आहे तेवढाच त्याच्यासाठी पूर्ण अर्थसंकल्प असतो. जगातील प्रत्येक माणूस मग तो गरीब असो की श्रीमंत, सामान्य असो की असामान्य असा प्रत्येकजणच आर्थिक व्यवहार करीत असतो. आर्थिक व्यवहार ही इतकी सामान्य बाब असताना अर्थशास्त्र व त्यातील संज्ञा आणि संकल्पना एवढ्या किचकट आणि अगम्य का असतात हे एक कोडेच आहे. सर्वहारांसाठी मार्क्सवादी तत्त्वज्ञान जितके दुर्बोध असते तितकाच सर्वसामान्यांसाठी अर्थसंकल्प दुर्बोध असतो. यातून देशाच्या आर्थिक व्यवहाराबद्दल आणि धोरणाबद्दल आधीच असलेल्या अनास्थेत भर पडते. लोक आणि अर्थसंकल्प याची फारकत होते. म्हणूनच सर्वसामान्यांना कळेल अशा शब्दात अर्थसंकल्प मांडल्या गेला पाहिजे. एका कसोटीच्या आधारे अर्थसंकल्प पाहिला तर तो चांगला की वाईट, आर्थिक समस्या सोडविणारा की वाढविणारा याचे उत्तर मिळू शकते. ती कसोटी आहे अर्थसंकल्प सादर होण्याआधीचे सादर होणारे आर्थिक सर्वेक्षण. देशाच्या अर्थव्यवस्थेची दशा व दिशा दर्शविणारे हे सर्वेक्षण बऱ्यापैकी विश्वासार्ह मानल्या जाते. या वर्षीचे सर्वेक्षण सादर करताना अर्थमंत्र्यांनी भविष्याबद्दल गुलाबी आशावाद व्यक्त केला असला तरी सर्वेक्षणात सादर आकडे त्याच्या विपरीत आहेत. विकासदर कमी झालेला आहे. कृषीविकास तर नेहमीप्रमाणे रेंगाळला आहेच, पण औद्योगिक विकासदरात गतवर्षीपेक्षा तब्बल ५% इतकी चिंताजनक घट झाली आहे. फक्त सेवाक्षेत्राचा विकास दिलासा देणारा आहे. देशांतर्गत उत्पन्नाशी सेवाक्षेत्राच्या उत्पन्नाचा कमी संबंध असल्याने हे घडले. दुसऱ्या देशांना स्वस्त मनुष्यबळाच्या आधारे दिल्या जाणाऱ्या सेवांमुळे सेवाक्षेत्राचा विकासदर वाढला आहे. एकूण राष्ट्रीय उत्पन्नाचा विचार केला तर जवळपास ६० टक्के उत्पन्न सेवा क्षेत्रातून आणि उर्वरीत ४० टक्के उत्पन्न हे औद्योगिक व शेतीक्षेत्रातून मिळाल्याचे हे सर्वेक्षण दर्शविते. औद्योगिक व शेतीक्षेत्राच्या आधारे जगणारी प्रचंड लोकसंख्या आणि तुलनेत सेवाक्षेत्राच्या आधारे जगणारी कमी लोकसंख्या लक्षात घेतली तर देशात विषमता का वाढली याचे उत्तर या सर्वेक्षणातून मिळते. औद्योगिक व कृषी उत्पन्न घटते आहे आणि खर्च मात्र वाढतो आहे ही वस्तुस्थिती या सर्वेक्षणाने स्पष्ट केली आहे. हा वाढता खर्च जसा प्रशासनिक आहे तसाच अनुत्पादक; पण लोकप्रिय योजनांसाठीचा देखील आहे. याचा अर्थ विकासातील असमतोल दूर करून उत्पादनवाढीला चालना देणे हे प्रमुख आव्हान देशाच्या अर्थव्यवस्थेपुढे आहे आणि हे आव्हान पेलणारा हा अर्थसंकल्प आहे की नाही या कसोटीवर हा अर्थसंकल्प तपासला पाहिजे.

### आर्थिक सुधारणांना सोडचिठ्ठी

सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पावरून असे दिसते की समतोल विकास आणि उत्पादन वाढ ही काही अर्थमंत्र्यांची प्राथमिक चिंता नव्हती. चिंताजनक पातळीवर पोचलेल्या सरकारच्या वाढत्या खर्चाची जुळवाजूळव कशी करायची हीच अर्थमंत्र्याची प्राथमिक चिंता होती आणि या अर्थसंकल्पाने सरकारची खर्चाची चिंता तेवढी दूर केली आहे; पण ही चिंता दूर करण्यासाठीचा कर वाढविण्याचा धोपटमार्ग त्यांनी अवलंबिला आहे. जमा आणि खर्च यांच्यात मेळ नसण्याची तीन मूलभूत आणि महत्त्वाची कारणे जगजाहीर आहेत. पहिले कारण प्रशासन व नोकरशाहीवर होणारा अमाप व अविवेकी खर्च, दुसरे कारण सूट आणि सबसिडी यांवरील न पेलणारा खर्च आणि अनुत्पादक लोकानुनयी योजनांवरील वाढता खर्च. अर्थसंकल्प सादर करण्याआधी अर्थमंत्र्यांनी या खर्चामुळे आपली झोप उडाली असल्याचे विधान केले होते; पण तरीही झोप उडविणाऱ्या या खर्चात कपात करण्याची कोणतीही योजना आणि मनीषा या अर्थसंकल्पात नाही. खर्च भागविण्यासाठी उत्पन्न वाढीऐवजी कर आणि कर्ज याला प्राधान्य देण्यात आले. अर्थव्यवस्था वेगाने वाढत असल्याचा दावा करून सरकारने आपली पाठ थोपटून घेतली असली तरी वेगाने वाढणाऱ्या

या अर्थव्यवस्थेत भांडवल निर्मिती होताना दिसत नाही. त्याचमुळे एवढ्या मोठ्या रकमेच्या अर्थसंकल्पात अर्थमंत्र्यांना पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी कर्ज रोख्यांचा आश्रय घ्यावा लागला आहे. अर्थव्यवस्थेत भांडवल निर्मिती मंदावली आहे, कारण उद्योगासाठी आणि शेतीसाठी लागणारे भांडवल आणायचे कोठून हा प्रश्न आहे आणि या मूलभूत प्रश्नाचे या अर्थसंकल्पात काहीच उत्तर नाही. जागतिकीकरणाने उद्योगात परकीय भांडवल येण्याची सोय झाल्याने उद्योग क्षेत्र तग धरून आहे व धिम्या गतीने का होईना वाढते आहे; पण शेतीक्षेत्रासाठी तीदेखील सोय नसल्याने त्या क्षेत्राची घसरण सुरू आहे. देशातील प्रगत राज्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्राचा शेतीचा विकास दर उणे ९ टक्के झाला आहे. यावरून शेतीक्षेत्राचे संकट किती गडद झाले आहे याची प्रचीती येते; पण शेतीक्षेत्राला संकटातून बाहेर काढण्यासाठी कोणतीही ठोस उपाययोजना अर्थसंकल्पात नाही. आधीच्या वर्षापेक्षा १०-२० टक्के अधिकच्या रकमेची तरतूद केल्याने सुटेल असा हा साधा आणि सोपा प्रश्न नाही. ज्यांना शेतीक्षेत्राला लागणाऱ्या भांडवलाची पुसटशी कल्पना नाही ते अज्ञानी अर्थपंडित सरकारने शेतीसाठी भक्कम तरतूद केल्याचा गवगवा करीत आहेत. शेतीसाठीची तरतूद १८ टक्क्यांनी वाढून किती झाली आहे तर २० हजार २०८ कोटी रुपये! देशातील ६० टक्के जनता उदरनिर्वाहासाठी ज्या शेतीक्षेत्रावर अवलंबून आहे त्या क्षेत्रासाठीची ही तरतूद आहे! आदिवासी जाती आणि जमाती उपयोजनासाठीचा निधी शेतीक्षेत्रापेक्षा जवळपास तिप्पट (जवळपास ५९ हजार कोटी रुपये!) आहे हे लक्षात घेतले तर शेतीसाठी केलेली तरतूद किती अत्यल्प आणि हस्यास्पद आहे हे लक्षात येईल. शेतीसाठी कर्जाची सोय एक लाख कोटीने वाढवून ५ लाख ७५ हजार कोटी केली आहे; पण गेल्या वर्षीच्या तरतुदीपेक्षा बँकांनी सुमारे पावने दोन लाख कोटी कमी कर्ज वाटले आहे, हे लक्षात घेतले तर या वाढीव आकड्याने हुरळून जाण्याचे कारण नाही. राबराब राबून उत्पादन वाढवूनदेखील शेतकऱ्याच्या हाती कर्जाशिवाय काही उरत नसल्याने शेती उत्पादन पाहिजे असेल तर कर्ज पुरवठा करणे सरकारसाठी अनिवार्य आहे. शेती कर्ज हे शेतकऱ्याला शेतीवर वेठबिगारी करायला लावून त्याच्या उत्पादनावर डल्ला मारण्याची जादूची कांडी आहे. जुन्या मार्गांनी शेती उत्पादनाची कमाल मर्यादा गाठून आता उत्पादन कमी कमी होऊ लागले आहे. वातावरण बदलाचा तडाखा शेतीक्षेत्राला बसू लागला आहे. वातावरण बदलाला तोंड देऊन शेती उत्पादन वाढवायचे असेल तर नव्या संशोधनाची, नव्या तंत्रज्ञानाची शेतीक्षेत्राला गरज आहे. त्यासाठीही मोठे भांडवल लागणार आहे; पण अर्थसंकल्पात यासाठी हजार-बाराशे कोटींची तरतूद करून अर्थमंत्री मोकळे झाले आहेत. नंतर उद्योगक्षेत्राचा आणि सेवाक्षेत्राचा जो कायापालट झाला तो केवळ अर्थव्यवस्था खुली केल्याने झाला आहे. अर्थव्यवस्था खुली झाल्यानेच जगातून देशात भांडवल आणि तंत्रज्ञान आले, जागतिक संशोधनाचा लाभ उद्योग आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्राला मिळाला. त्यांची भरभराट झाली; पण शेतीक्षेत्रात ना भांडवल आले, ना तंत्रज्ञान. संशोधन तर दूरची गोष्ट आहे. देशात वाढत्या विषमतेचे हे कारण आहे. जागतिकीकरणाने विषमता वाढली हे अगदी खरे आहे; पण विषमता वाढली ती शेतीक्षेत्रात जागतिकीकरण किंवा आर्थिक सुधारणांचा प्रवेश होऊ दिला नाही म्हणून. ज्या सर्वांगिण विकासाची भाषा अर्थमंत्र्यांनी केली आहे ती शेतीत आर्थिक सुधारणा राबविल्याशिवाय शक्य नाही; पण त्या दृष्टीने या अर्थसंकल्पात काहीच नाही. शेतीक्षेत्र तर सोडाच पण सर्वच क्षेत्रांत आर्थिक सुधारणांबाबत मौन पाळणारा हा १९९१ नंतरचा पहिला अर्थसंकल्प आहे. परतीचा पाऊस येऊन गेला की, पावसाळा संपतो तसाच सुधारणांचा परतीचा प्रवास पूर्ण झाल्याने आर्थिक सुधारणांचे एक चक्र पूर्ण होऊन थांबल्याची जाणीव करून देणारा हा अर्थसंकल्प आहे.

## आर्थिक सुधारणांनी दगा दिला!

परतीचा पाऊस आणि दगा हे समीकरण शेतकऱ्यासाठी नवे नाही. आर्थिक सुधारणांनी देखील शेतकऱ्यांना असाच दगा दिला आहे. नव्वदीच्या दशकात भारतात म्हणण्यापेक्षा इंडियात आर्थिक सुधारणांचा पाऊस चांगलाच कोसळला. मात्र शेतीक्षेत्र कोरडेच राहिले. सुधारणांचा प्रत्यक्ष पाऊस पडला नाही, तरी इंडियात जास्तीचा पाऊस झाल्याने तेथून सुधारणांच्या फायद्याचे पाट भारताकडे वाहू लागतील असे शेतकऱ्याला वाटत होते. आर्थिक सुधारणांमुळे इंडियातील मोठ्या जनसंख्येच्या हाती भरपूर पैसा आल्याने आपल्या उत्पादनाला न्याय्य किंमत द्यायला हा वर्ग मागे पुढे पाहणार नाही ही समजूत भाबडी ठरली. या वर्गाची अल्प भावात अन्न-धान्य आणि भाजीपाला खायची सवय नडली. आर्थिक सुधारणांनी समृद्ध झालेल्या या वर्गाच्या सरकारवर दबाव टाकण्याच्या क्षमतेतही वाढ झाली आणि या दबावाचा उपयोग शेतीमालाच्या किमती कमी राहाव्यात यासाठी केला गेला. जागतिकीकरणानंतर भारतीय शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढण्याचे हे खरे कारण आहे! आर्थिक सुधारणांचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष असा कोणताच फायदा शेतीक्षेत्राला झाला नाही. काही उरले तर आईच्या वाट्याला येते नाही तर तिला उपाशी राहावे लागते तसेच शेतकऱ्याच्या बाबतीतही होत आले आहे. इतरांचा लाभ झाल्यावर सुधारणांचा कृषीक्षेत्रात प्रवेश होईल या आशेवर २० वर्षे गेलीत. गेल्या वर्षभरात आर्थिक सुधारणा थांबल्या आहेत असे वाटण्याइतपत सुधारणांचा वेग मंदावला होताच. सुधारणांची गाडी फार पुढे सरकेल असे वाटत नव्हते; पण परतीच्या पावसाची वाट पाहायची सवय लागलेल्या शेतकरी समुदायाला सुधारणांचा प्रवास थांबण्याआधी आपल्या पदरात काहीतरी पडेल असे वाटत होते. किराणा क्षेत्रातील विदेशी गुंतवणुकीच्या चर्चेने आशा निर्माण झाली होती. जाता जाता काही सुधारणांचा पाऊस शेतीक्षेत्रावर पडेल असे ज्यांना वाटत होते त्यांची मात्र घोर निराशा झाली. परतीचा पाऊस जसा पावसाळा संपल्याचे निदर्शक असते तसाच ताजा केंद्रीय अर्थसंकल्प आर्थिक सुधारणांचा परतीचा प्रवास पूर्ण झाल्याचा संकेत देणारा आहे. आर्थिक सुधारणांच्या बाबतीत शेतीक्षेत्र पूर्णपणे कोरडे ठेवून आर्थिक सुधारणांचे पर्व संपले आहे. निसर्गचक्रानुसार परतीच्या पावसानंतर पुन्हा पावसाळा येतो; पण देशातील राजकीय आणि आर्थिक परिस्थिती लक्षात घेता धोरणकर्त्यांना आर्थिक सुधारणा राबविण्याची निकड नजीकच्या भविष्यात वाटेल अशी सुतराम शक्यता नाही. सुधारणांची पताका ज्यांनी आपल्या खांद्यावर घेतली होती त्या मनमोहनसिंह यांच्या नेतृत्वाखालील सरकारने ती पताका खाली ठेवून आर्थिक सुधारणांकडे पाठ फिरविली आहे. सुधारणा राबविण्याची इच्छाशक्ती आणि धमक या सरकारमध्ये उरली नसल्याचे या अर्थसंकल्पाने दाखवून दिले आहे. अर्थव्यवस्थेसमोरील आव्हानांवर कोणतीही उपाय योजना नसल्याने याला अर्थसंकल्प म्हणताच येणार नाही. फार तर याला सरकारचा सत्तेत चिकटून राहण्याचा संकल्प म्हणता येईल. शेतीक्षेत्रात आर्थिक सुधारणा राबविण्यासाठी दबाव आणण्यातील शेतकरी चळवळीचे अपयश पुढेही चालूच राहिले तर सरकारचा हा संकल्प शेतीक्षेत्रासाठीची मृत्युघंटाच ठरणार आहे.

**सुधाकर जाधव**
पांढरकवडा, जि.यवतमाळ मो. ९४२२१६८१५८
ssudhakarjadhav@gmail.com
http://myblog-common-nonsense.blogspot.com/

■■